सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०५ सप्टेंबर २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक १५४ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com













## बंगाल विधानसभेत भाजप-तृणमूल आमदारांमध्ये धक्काबुक्की




कोलकाता, ०४ सप्टेंबर : पश्चिम बंगाल विधानसभेच्या विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, गुरुवारी, भाजपशासित राज्यांमध्ये बंगाली स्थलांतरित कामगारांवरील अत्याचाराच्या निषेधार्थ मांडण्यात आलेल्या ठरावावर चर्चा सुरू असताना सभागृहात अभूतपूर्व गोंधळ आणि धक्काबुक्की झाली.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी ठरावावर बोलण्यासाठी उभ्या राहिल्या, तेव्हा विरोधी पक्ष भाजपचे आमदार आपल्या जागांवरून उभे राहून जोरदार घोषणा देऊ लागले. सतत घोषणा देणे आणि सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण केल्याच्या आरोपाखाली विधानसभा अध्यक्ष (स्पीकर) विमान बॅनर्जी यांनी भाजपच्या पाच आमदारांना - मुख्य सचेतक डॉ. शंकर घोष, अग्निमित्रा पॉल, मिहिर गोस्वामी, अशोक दिन्दा आणि बंकिम घोष - यांना आजच्या उर्वरित दिवशी कामकाजातून निलंबित केले. सभागृहात सुमारे दीड तास दोन्ही पक्षांतून गोंधळ आणि घोषणाबाजी सुरू होती. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या संपूर्ण भाषणात जोरदार घोषणांमुळे व्यत्यय आला.

यावेळी सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या आमदारांनीही भाजप चोर आहे अशा घोषणा देत प्रतिसाद दिला.

गोंधळाची सुरुवात दुपारी १.५० वाजता झाली, जेव्हा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी ठरावावर बोलण्यासाठी उभ्या राहिल्या. तेव्हा भाजपचे मुख्य सचेतक डॉ. शंकर घोष यांनी आरोप केला की, आमच्या सर्व वक्त्यांना स्पीकर यांनी बोलू दिलं नाही.

स्पीकर बॅनर्जी यांनी या आरोपांना फेटाळून लावले आणि वारंवार भाजप आमदारांना शांत बसण्याचे आवाहन केले. मात्र, घोषणाबाजी सुरूच राहिली. विरोधी आमदार सभागृहाच्या मध्यभागी येऊन घोषणा देत होते आणि कागद फाडून हवेत फेकत होते.

चेतावणीनंतर स्पीकर यांनी डॉ. शंकर घोष यांना सभागृहाच्या उर्वरित कामकाजातून निलंबित केले आणि त्यांना बाहेर काढण्याचे आदेश मार्शलना दिले. यावेळी भाजप आमदार आणि मार्शलमध्ये जोरदार झटापट झाली. इतर भाजप आमदारांनी डॉ. घोष यांच्याभोवती गर्दी केली, त्यातून दोन्ही बाजूंनी जोरदार धक्काबुक्की झाली आणि शेवटी घोष हे खाली पडले.

अखेर मार्शल्सनी त्यांना जबरदस्तीने खेचून बाहेर काढले. गोंधळातही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आपले भाषण देण्याचा प्रयत्न करत होत्या, पण घोषणाबाजी सुरूच होती.

त्यानंतर स्पीकर यांनी भाजपचे आणखी ४ आमदार - अग्निमित्रा पॉल, मिहिर गोस्वामी, अशोक दिन्दा आणि बंकिम घोष - यांनाही कामकाजात अडथळा निर्माण केल्याबद्दल निलंबित केले. स्पीकर यांनी भाजप आमदारांच्या वर्तनाचा निषेध करत म्हटले की, ही विधानसभा आहे, क्लब रूम नाही.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी भाषणात भाजपवर जोरदार टीका केली. त्यांनी आरोप केला की, भाजपला बंगाल आणि बांग्ला भाषेची चीड आहे. ते बांग्ला विरोधी आणि देशद्रोही आहेत. भाजप म्हणजे चोर आणि डाकूंचा पक्ष आहे. गोडसेच्या विचारांचा पक्ष म्हणजे भाजप.

त्यांनी आरोप केला की, भाजप देशभरात अत्याचार करत आहे. बंगालमध्येही लोकांवर अन्याय होत आहे. माझ्या आवाजाला लोकांपर्यंत पोहोचू न देणं, ही भाजपची कटकारस्थाने आहे. बांग्ला भाषेचा अपमान करणारा पक्ष म्हणजे भाजप. ते बंगालला गुलाम बनवू इच्छितात. मी बांग्ला भाषेचा अपमान कधीही सहन करणार नाही. यावेळी ममतांनी भाजप चोर, मोदी चोर, व्होट चोर, गादी छोड़ अशा घोषणा सभागृहात दिल्या.

## 'या' अल्पसंख्यांकांना पासपोर्टशिवाय भारतात राहण्याची मुभा

नवी दिल्ली : पाकिस्तान, अफगानिस्तान आणि बांगलादेश येथून भारतात आलेल्या हिंदू, शीख, ख्रिस्ती, बौद्ध, जैन आणि पारशी अल्पसंख्यांकांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. गृह मंत्रालयाने जारी केलेल्या नव्या आदेशानुसार, ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी भारतात आलेल्या अशा व्यक्तींना पासपोर्ट नसतानाही भारतात राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. गृह मंत्रालयाने सोमवारी इमिग्रेशन आणि परदेशी (सूट) आदेश २०२५ जारी करत ही माहिती दिली.



या आदेशानुसार, जर संबंधित व्यक्ती ३१ डिसेंबर२०२४ पूर्वी भारतात दाखल झाली असेल, तर तिला पासपोर्ट नसतानाही देशात वास्तव्यास परवानगी मिळणार आहे. मात्र, हे नियम केवळ वरील तीन देशांतील विशिष्ट अल्पसंख्यांक समुदायांवरच लागू होणार आहेत. तसेच, १९५९ ते ३० मे २००३ दरम्यान नेपाळ, भूतान आणि तिबेटमधून भारतात आलेल्या व्यक्तींनाही परदेशी नोंदणी अधिकाऱ्यांकडे नोंदणी केल्यास भारतात पासपोर्टशिवाय राहण्याची मुभा मिळणार आहे. मात्र, चीन, मकाऊ, हाँगकाँग आणि पाकिस्तानमधून भारतात येणाऱ्या नेपाळी आणि भूतानी नागरिकांवर हे सवलतीचे नियम लागू होणार नाहीत.

यापूर्वी एप्रिलमध्ये केंद्र सरकारने पासपोर्टशिवाय भारतात प्रवेश करणाऱ्यांसाठी कडक दंडात्मक तरतुदी मंजूर केल्या होत्या. त्या अंतर्गत, अशा व्यक्तींना ५ वर्षांपर्यंतची शिक्षा, ५ लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्हीही होऊ शकतात. मात्र, नव्या आदेशानुसार काही विशिष्ट अल्पसंख्यांक गटांना यामध्ये सूट देण्यात आली आहे. पासपोर्टशिवाय भारतात आलेल्या इतर विदेशी नागरिकांवर मात्र कडक कारवाई केली जाईल. अशा नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचा दंड भरावा लागेल असे केंद्रीय गृहमंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

## जीएसटी स्लॅब बदलांमुळे दिलासा : एकनाथ शिंदे



मुंबई: महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रचनेतील ताज्या बदलांना नागरिकांसाठी मधुर दिवाळी भेट म्हटलं आहे. त्यांनी ५६ व्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत जाहीर झालेल्या या सुधारणांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची प्रशंसा केली. सुधारित प्रणालीमुळे १२% आणि २८% च्या स्लॅबला दोन सोप्या टप्प्यात विभागले आहे-५% आणि १८%-तर ४०% चा स्लॅब पाप आणि लक्झरी वस्तूंसाठी कायम ठेवला आहे. शिंदे यांनी हा बदल आत्मनिर्भरता आणि आर्थिक वाढीला चालना देईल, असं सांगत याला एक मजबूत भारतासाठी उचललेलं धाडसी पाऊल म्हटलं. नवीन संरचनेनुसार, दुग्धजन्य पदार्थ, स्वयंपाकघरातील वस्तू आणि शेतीची साधने यासारख्या अत्यावश्यक वस्तू ५% च्या टप्प्यात येतात. तर १८% दरात इलेक्ट्रॉनिक्स, ऑटो पार्ट्स आणि व्यावसायिक सेवांचा समावेश आहे. उच्च श्रेणीतील मोटारसायकल्स, लक्झरी कार आणि तंबाखू उत्पादनांवर ४०% चा मोठा कर कायम आहे. शिंदे यांनी पुढे सांगितलं की, या सुधारणेमुळे आरोग्य आणि विम्याची परवड वाढेल आणि लहान व्यवसायांवरील ताण कमी होईल, याला त्यांनी 'नवीन भारत'च्या दिशेने एक मैलाचा दगड म्हटलं.

## जीएसटी कर रचनेच्या बदलावर वचन पूर्ण केल : पंतप्रधान

नवी दिल्ली: वाढणाऱ्या महागाईचा फटका प्रत्येक देशवासीयांना बसत आहे. त्यात सणासुदीच्या काळांत वाढणारे कर सामान्यांच्या खिशाला कात्री लावून जातात. गेले कित्येक वर्षांपासून वाढत चाललेली ही सामन्य माणसांची ही आर्थिक चणचण आता काहीप्रमाणात कमी होणार आहे. कारण. महागाईमुळे होरपळणाऱ्या जनतेच्या जखमावर अखेरीस केंद्र सरकारने मलम लावण्याचा प्रयत्न केला आहे. बुधवारी पार पडलेल्या जीएसटी परिषदेच्या ५६व्या मॅरेथॉन बैठकीमध्ये अखेरीस कर रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. ज्यात सामान्यांच्या हितावह अनेक महत्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. या बदलाचे स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पहिली प्रतिकिया देखील समोर आली. 'दिलेला शब्द मी पाळला, जे बोललो होतो ते करून दिले असे त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे सांगितले आहे.



जीएसटीच्या करप्रणालीमध्ये बदल

२०१७ मध्ये लागू झालेल्या जीएसटीच्या करप्रणालीमध्ये अखेरीस बदल करण्यात आला आहे. १८ आणि २८ टक्के जीएसटी कर प्रणाली रद्द करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, 'मी दिलेलं वचन पूर्ण केलं आहे. आता याचा फायदा सामान्य माणूस, शेतकरी, एमएसएमई, मध्यमवर्गीय, महिला आणि तरुणांना होईल' अशी प्रतिक्रिया दिली.

पंतप्रधानांनी ट्विट करत दिली माहिती

जीएसटी परिषदेच्या ५६व्या मॅरेथॉन बैठकीमध्ये अखेरीस कर रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. आता केवळ ५ टक्के आणि १८ टक्के हे दोनच कर स्लॅब राहणार आहे. या निर्णयावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करून आपली प्रतिक्रिया दिली.

'स्वातंत्र्यदिनाच्या माझ्या भाषणात, मी म्हटलं होतं की, आम्ही जीएसटीमध्ये पुढील पिढीसाठी सुधारणा आणण्याचा मानस करतो. केंद्र सरकारने एक सविस्तर प्रस्ताव तयार केला आहे, ज्यामध्ये व्यापक जीएसटी दरांचे तार्किक पुनर्रचना आणि प्रक्रिया सुधारणांचा समावेश आहे. त्याचे उद्दिष्ट सामान्य नागरिकांचे जीवन सोपे करणे आणि अर्थव्यवस्था मजबूत करणे आहे.' अशी प्रतिक्रिया पंतप्रधानांनी दिली. तसंच, 'जीएसटी कौन्सिल, ज्यामध्ये केंद्र आणि राज्य दोन्ही समाविष्ट आहेत, मला हे कळवण्यास आनंद होत आहे की, केंद्र सरकारने सादर केलेल्या जीएसटी दरांमध्ये कपात आणि सुधारणांचे प्रस्ताव एकत्रितपणे मंजूर करण्यात आले आहेत. याचा फायदा सामान्य माणूस, शेतकरी, एमएसएमई, मध्यमवर्गीय, महिला आणि तरुणांना होईल. या व्यापक सुधारणांमुळे आपल्या नागरिकांचे जीवन सुधारेल आणि सर्वांसाठी, विशेषतः लहान व्यापारी आणि व्यवसायांसाठी व्यवसाय करण्याची सोय सुनिश्चित होईल' अशी आशाही पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली आहे.

## अमरावती, अकोला, मालेगावमध्ये बोगस जन्म नोंदी उघडकीस- किरीट सोमय्या



अकोला, ४ सप्टेंबर : अमरावती, अकोला आणि मालेगाव शहरांमध्ये बोगस जन्म नोंदींचा मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. तब्बल ५ हजार अर्ज संशयास्पद असल्याचं समोर आलं असून, त्यातील १३३ प्रकरणांमध्ये बनावट आधार कार्ड, एकसारखी जन्मतारीख असलेली शपथपत्रं आणि विरोधाभासी प्रमाणपत्रं वापरण्यात आली आहेत.

दरम्यान, भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आज अकोल्यातील रामदास पेठ पोलीस ठाण्यात या घोटाळ्याची यादी सादर केली. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितलं की, जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली असून, येत्या आठवड्यात १३३ जणांविरोधात गुन्हे दाखल होणार आहेत. सोमय्यांनी गंभीर आरोप केला की, काही तहसीलदार आणि कर्मचाऱ्यांच्या संमतीने ही फसवणूक करण्यात आली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय नोंदींमध्ये फेरफार झाल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. सध्या पोलीस आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधून कारवाई सुरू आहे. येत्या काळात या प्रकरणात अधिक मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.

काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर म्हणाल्या किरीट सोमय्या ना मंत्री आहेत, ना आमदार. मग कोण आहेत जे पोलिस आणि प्रशासनावर दबाव टाकून लोकांवर जबरदस्तीने केस दाखल करण्यासाठी सांगत असल्याचा आरोप केला. दरम्यान यावर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी प्रतिउत्तर दिलं आहे. आमच्या देश महत्वाचा आहे. देशाची सुरक्षा महत्वाची आहे. ज्याच्याकडे भारतात जन्म झाल्याचा एक पण पुरावा नाही. हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न मात्र या काँग्रेस च्या नेत्यांना वोट बँक महत्वाचे असल्याचा टोला सोमय्या यांनी लगावला आहे. यांची व्होट बँक घाबरली असल्याचं ते म्हणाले. राहुल गांधी यांच्यासह यांची कोर्टात जाण्याची हिम्मत नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तर माझ्यावर ज्यांनी हल्ला केला त्यांना अटक झाली आहे. पोलीस तपास सुरू आहे. मात्र असे कितीही हल्ले यांनी केले तरी मी घाबरणार नाही. ८० हजार तर पळून गेले. असल्याचं म्हटलं आहे. तर लवकरच बांगलादेशी, रोहिनग्या प्रकरणी कारवाई होईल असंही त्यांनी म्हटलं आहे.

## जोपर्यंत हे राज्य आहे, तोपर्यंत एका समाजाचं काढून दुसऱ्याला देण्याचा विचार होऊ शकत नाही.: मुख्यमंत्री

मुंबई: मराठा आरक्षणाच्या शासन निर्णयावरून ओबीसी नेते नाराज आहेत. छगन भुजबळ यांनी तर मंत्रिमंडळ बैठकीत अनुपस्थिती लावत आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. ज्यावर मुख्यमंत्र्यांनी एका वाक्यात उत्तर देत ओबीसींच्या आरक्षणावर मोठी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईत ५ दिवस उपोषण केल्यानंतर, अखेरीस सरकारने त्यावर तोडगा काढला. त्यांच्या हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट लागू करण्यावर सरकारने सहमती दर्शवली. तसेच याविषयीचा जीआर देखील काढला गेला. पण यामुळे दुसरीकडे, ओबीसी समाजाचे आरक्षण धोक्यात येते की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे, आणि याच कारणांमुळे ओबीसी नेते यांनी मंत्री छगन भुजबळ नाराज झाले आहेत. त्यांनी कालच्या कॅबिनेट बैठकीवर बहिष्कार घालत आपला राग व्यक्त केला होता. यावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली.



काय म्हणाले मुख्यमंत्री?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भुजबळांच्या मंत्रिमंडळ बैठकीतील बहिष्कारवर बोलताना भुजबळ यांच्या मनतातील सर्व शंका लवकरच दूर करणार असल्याचे सांगितले. भुजबळ कॅबिनेटमधून कुठेही निघून घेले नाहीत. त्यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. मी त्यांना अश्वस्त केले आहे. जो जीआर काढलेला आहे. त्याचा ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही. हा सरसकट जीआर नाही. हा पुराव्याचाच जीआर आहे. फक्त मराठवाड्यामध्ये निजामाचं राज्य होतं. त्यामुळे इंग्रजांच्या राज्याचं पुरावे हे इतर ठिकाणी मिळतात. मराठवाड्यात मिळत नाहीत. त्यामुळे निजामाचे पुरावे आपण ग्राह्य धरले आहेत. जे खरे कुणबी आहेत. त्यांनाच हा लाभ मिळेल. जे खरे हक्कदार आहे, त्यांनाच त्याचा फायदा होईल. यामध्ये कुणालाही खोटेपणा करता येणार नाही. त्यामुळे अनेक ओबीसी संघटनांनी या जीआरचे स्वागत केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ओबीसींवर अन्याय होणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, जोपर्यंत हे राज्य आहे, तोपर्यंत एका समाजाचं काढून दुसऱ्याला देण्याचा विचार होऊ शकत नाही. आम्ही मराठ्याचं मराठ्यांना तर ओबीसींच ओबीसींना देणार आणि खरा अधिकार ज्याचा त्यांना देणार. दोन समाजाला कधीच एकमेकांसमोर आणणार नाही. अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.




## डिजिटल भारत: देशात इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या १०० कोटींच्या पुढे

नवी दिल्ली: भारताने डिजिटल जगात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. देशातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या तब्बल १०० कोटींचा टप्पा ओलांडून १००२.८५ दशलक्ष (सुमारे १००.२८ कोटी) वर पोहोचली आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ढठ-ख) जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, ही वाढ मार्च २०२५ च्या तिमाहीच्या तुलनेत ३.४८ टक्के आहे.

या अहवालातून अनेक महत्त्वाचे मुद्दे समोर आले आहेत. एकूण इंटरनेट वापरकर्त्यांपैकी ९५.८१ कोटी ग्राहक वायरलेस इंटरनेटचा वापर करतात, तर केवळ ४.४७ कोटी ग्राहकांकडे वायरड इंटरनेट कनेक्शन आहे. ब्रॉडबँड वापरकर्त्यांची संख्या ३.७७ टक्क्यांनी वाढून ९७.९७ कोटी झाली आहे, तर नॅरोबँड वापरकर्त्यांची संख्या २.३१ कोटींवर आली आहे. यामुळे देशाची एकूण दूरसंचार घनता वाढून ८६.०९ टक्क्यांवर पोहोचली आहे, जी मागील तिमाहीत ८५.०४ टक्के होती.




शहरी आणि ग्रामीण भागातील वाढ

आकडेवारीनुसार, शहरी भागातील इंटरनेट ग्राहकांची संख्या ५७.९४ कोटी आहे, तर ग्रामीण भागातील ग्राहकांची संख्या ४२.३३ कोटी आहे. ही आकडेवारी डिजिटल इंडियाच्या वाढीची स्पष्ट साक्ष देते. दूरसंचार क्षेत्रातील मासिक सरासरी प्रति ग्राहक महसूल (-ठझण) वायरलेस सेवांसाठी १८६.६२ रुपये इतका आहे.

दूरसंचार क्षेत्राचा महसूल वाढला

समायोजित सकल महसूल ८१,३२५ कोटी रुपये असून, तो मागील तिमाहीच्या तुलनेत २.६५ टक्क्यांनी जास्त आहे. यामध्ये प्रवेश सेवांचा वाटा ८३.६२ टक्के आहे. तसेच परवाना शुल्क २.६३ टक्क्यांनी वाढून ६,५०६ कोटी रुपये झाला आहे, तर पास-थ्रू शुल्क १९.४५ टक्क्यांनी घटून १०,४५७ कोटी रुपये झाला आहे.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने सुमारे ९१२ खाजगी सॅटेलाइट टीव्ही चॅनेल्सना अपलिंकिंग किंवा डाउनलिंकिंग किंवा दोन्हीसाठी परवानगी दिली आहे. भारतामध्ये डाउनलिंकिंगसाठी उपलब्ध असलेल्या ९०२ सॅटेलाइट टीव्ही चॅनेल्सपैकी, ३० जून २०२५ पर्यंत ३३३ चॅनेल्स हे पे टीव्ही स्वरूपात आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### पेडगाव ग्रामपंचायतीकडून स्मशानभुमीत स्वच्छता व वृक्षारोपण

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील मौजे पेडगाव ग्रामपंचायतीतर्फे आज गुरुवार ४ सप्टेंबर रोजी सार्वजनिक स्मशानभूमी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी पर्यावरण संवर्धनासाठी छायादार, फळझाडे व औषधी वनस्पतींची लागवड करून परिसर हिरवागार करण्यात आला.

या उपक्रमात माजी जिल्हा परिषद सदस्य मुंजाभाऊ गायकवाड, अंबादासराव सुरवसे, राजूकाका देशमुख, सरपंच आशिष हरकळ, माजी उपसरपंच शेख सलमान, प्रकाशराव पारदे, लक्ष्मणराव हरकळ, ग्रामपंचायत सदस्य विलासराव देशमुख, अभय देशमुख, बाळू खरात, निखिल मांडे, तातेराव वरकड, अनिल आसुरे, हरीश पठाण, सोसायटी संचालक सोपानराव देशमुख, सतीश सुरवसे, करण कांबळे, संजय हरकळ, श्रीकांत गरड, सुरेश शिंदे, लक्ष्मण देशमुख, रंजीत अंभोरे, ज्ञानेश्वर शिंदे, रामदास शिंदे, दुर्गेराम गलांडे, ज्ञानेश्वर तरफडे, किसनराव हरकळ, मुंजा गायकवाड, महेश घुले, ज्ञानेश्वर खेडकर, संजय हरकळ, उद्धव गायकवाड, मनीष गायकवाड, विकास सुरवसे, ज्ञानेश्वर आंभोरे, प्रकाश हरकळ आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी होते.

दरम्यान, स्मशानभूमी परिसर हिरवाईने नटल्यामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळणार असून येत्या काळात स्मशानभूमीत तार फिक्सिंग, नागरिकांसाठी बसण्याची सोय तसेच इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असा विश्वास ग्रामपंचायतीकडून व्यक्त करण्यात आला.

### जिल्हास्तरीय कला महोत्सवात विद्यार्थ्यांद्वारे कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कला महोत्सवाचे आयोजन परभणीतील ज्ञानोपासक महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी इयत्ता नववी ते बारावीतील विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकारांमधून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य शेख मोहम्मद बाबर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद खुणे, कला व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा रोडे, परीक्षक कथाकार बबन शिंदे, सुनंदा डिघोळकर, रामदास कुलकर्णी, मयंक परळीकर, राजेश निंबकर, संजय जाधव जांभळीकर, करंवदे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी एकल नृत्य, वादन, गायन, समूह नृत्य-गायन, समूह नाट्य, कथाकथन, चित्रकला, पारंपरिक वादन, शिल्पकला अशा विविध १२ कलाप्रकारांचे मनोहारी सादरीकरण केले. जवळपास १५० विद्यार्थी या कला महोत्सवात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या उत्साहवर्धक सहभागामुळे संपूर्ण वातावरण रंगतदार झाले होते.

छत्रपती संभाजीनगर विभागातील पाच जिल्ह्यांतील स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर निकाल संकलित करण्यात येणार असून, प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी राज्यस्तरीय कला उत्सवासाठी पुणे येथे जाणार आहेत. या स्पर्धांना विद्यार्थ्यांसह त्यांचे मार्गदर्शक शिक्षक आणि रसिक प्रेक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन डॉ. अमोल देशपांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन नालंदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगवे एस. पी., अंजली सावरगावकर, कल्पना दलाल, मंदा भरोसे, रणवीर सर, नितीन आळसे, सीमा जाधव, नामदेव खुळे, मीना लाड, दयानंद कापसे, संध्या गावंडे, अनिल जाधव, किरण रणवीर, के. बी. शिंदे, ढालेसर, पुंड, सुरकुरते, नालंदे, योगेश देशमुख, बलभीम कटारे, रमेश मरेवार आदींनी परिश्रम घेतले.

### राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र गहाळ यांची निवड : २७ डिसेंबर रोजी पहिले राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलना संपन्न होणार

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी येथील ग्रामीण कथाकार राजेंद्र गहाळ यांची परभणी येथील संस्कृती सेवाभावी संस्थेद्वारा आयोजित पहिल्या राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. हे संमेलन वसमत (जि. हिंगोली) येथे २७ डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार आहे.

संस्कृती सेवाभावी संस्थेच्या संयोजन समितीची बैठक अध्यक्ष किरण खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस सचिव सिद्धार्थ कांबळे व पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत गहाळ यांची संमेलनाध्यक्ष म्हणून निवड एकमुखाने करण्यात आली.

राजेंद्र गहाळ हे परभणीतील महात्मा फुले विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांचे 'कोंडी', 'दोन एकर', 'पोशिंदा' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.. शाळा, महाविद्यालय तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांत त्यांनी कथाकथनाचे शेकडो कार्यक्रम सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे. गहाळ यांच्या निवडीबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार ॲड. विजयराव गव्हाणे, उपाध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अशोक सोनी, सचिव दादासाहेब देशमुख, सहसचिव अजयराव गव्हाणे, दादासाहेब नाईकवाडे, प्राचार्य तुळशीराम वानरे, मुख्याध्यापक कैलासराव लोनसने, लखनसिंह जाधव, रमेशराव नाईकवाडे, शिवाजी विरसे, प्रदीप चव्हाण, नामदेव चापके आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

...

# शासनाने काढलेले जीआर तात्काळ रद्द करा

## पालम तालुक्यात ओबीसी समाज आक्रमक, तहसीलदार मार्फत केली मुख्यमंत्र्याकडे मागणी

**शांतीलाल शर्मा**

**पालम /प्रतिनिधी-** राज्यातील इतर मागासवर्गीय समाजावर अन्यायकारक काढलेल्या जीआर शासनाने तात्काळ रद्द करून समाजाला न्याय देण्याचे काम करावे याच मागणीसाठी दि.३ रोजी पालम तालुक्यातील सकल ओबीसी समाजाच्या वतीने ढोल ताशाच्या गजरात आक्रमक घोषणाबाजी देत तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी करण्यात आली आहे.

राज्य शासनाने राज्यातील इतर मागास असलेल्या समाजावर राज्य शासनाने इतर समाजाला ओबीसी मध्ये घेऊन या समाजावर अन्याय केला असून काढलेला जीआर राज्य शासनाने तात्काळ रद्द करून ओबीसी समाजाला न्याय देण्याचे काम करावे, ओबीसी समाजाचे प्रतिधित्व, हक्क आणि आरक्षण आरक्षित राहावे यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर करावे, अन्यायकारक परिणाम आधीच मर्यादित संधी असलेल्या ओबीसी समाजातील घटकांना आणखीन मागे टाकला जाईल यामुळे काढलेला हा जीआर राज्य शासनाने तात्काळ मागे घ्यावे यासह इतर मागणीसाठी तालुक्यातील सकल ओबीसी समाजाच्या वतीने अहिल्याबाई होळकर मंदिरापासून तहसील कार्यापर्यंत ढोल ताशाच्या गजरात तहसीलदार



मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे, या निवेदनावर नगरसेवक ज्ञानराज घोरपडे, गणेशराव घोरपडे, विजयकुमार घोरपडे, दतराव शेगुळे, विजय गणार,माऊली घोरपडे मंगेश घोरपडे, मारोती नाईकवाडे , बाळासाहेब ढोले, तानाजी पैके, राम गावंडे, विठ्ठल पांचाळ, विशाल गावंडे, सतिश बनसोडे, कैलास घोरपडे, गजानन सुरणर सुदाम घोरपडे,नितिन जाधव, पि,एस,लोखंडे विनोद घोरपडे, रुखमाजी गिनगिने, आधीची प्रमुख उपस्थिती होती.

## सेलू गावात मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यात मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे गावातील नदीला पूर आल्याने पाण्याचे स्रोत दूषित झाले व गावात आजारांचे प्रमाण वाढले.

या परिस्थितीची दखल घेत पालम तालुका आरोग्य अधिकारी डॉ.कालिदास निरस यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्यदीप बहुउद्देशीय संस्था व बाल गणेश मंडळ,श्री चक्रधर स्वामी सेवा भावी संस्था सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ सप्टेंबर



रोजी गावात मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरामध्ये १८७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरात रक्तदाब, रक्तशर्करा, संसर्गजन्य आजार, लहान मुलांचे आजार तसेच स्त्रीरोगविषयक सेवा पुरविण्यात आल्या. शिबिरात डॉ. भस्के, डॉ.निरस , डॉ. गीनगीने, डॉ. करवा, डॉ.अयोध्या मोरे शिंदे, डॉ.अमोल सांगोळे, डॉ.स्वप्नील शिंदे, प्रा. गणेश शिंदे यांनी वैद्यकीय सेवा दिल्या. शिबिर यशस्वी करण्यासाठी बाल गणेश मंडळ कार्यकर्ते पंडित शिंदे, विजय गायकर, संभाजी गुरव, सिद्धांत शिंदे, गजानन शिंदे, संस्कार शिंदे, किशनराव शिंदे,गणेश शिंदे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

### पालम येथील लंबोदर गणेश मंडळ शांततेत विसर्जन करणार



**पालम,/प्रतिनिधी-** येथिल लंबोधर गणेश मंडळ ऑटो पॉईट गंगाखेड रोड पालम या मंडळाची स्थापना ४४ वर्षा खाली झाली होती. या नतंर या गणेश मंडळाला पोलीस प्रशासनाकडून प्रथम पारितोषिक देण्यात आले होते.

गणेश मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत आसते.

तसेच शासनाच्या नियमा प्रमाणे डिजे मुक्त, गुलाल मुक्त व शांततेत विसर्जन करण्यात येत असते. या वर्ष गणेश मंडळाच्या वतीने टाळ मृदंगाच्या गजरात गणपती विसर्जण सर्वात आधी करण्यात येणार व गुलाल वजी फुलांचा वर्षाव करत मिरवणूक काडून विसर्जन करण्यात येणार आसल्याचे लंबोदर गणेश मंडळाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### जिवनराव आकात यांचे निधन

**सेलू,/प्रतिनिधी:** तालुक्यातील



साळेगाव येथील रहिवासी तथा माजी पंचायत समिती सदस्य, जीवनराव रावसाहेब आकात वय ८० वर्ष, यांचे मंगळवार ०२ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता दुखद निधन झाले. त्यांच्या वर बुधवार ०३ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता, साळेगाव येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे तालुका अध्यक्ष,शिवाजी आकात, यांचे ते वडील होत.

## रविवारी श्री.सत्यनारायण कालानी स्मृती गौरव पुरस्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील श्री सत्यनारायण कालानी स्मृती सेवा ट्रस्टच्या वतीने मराठवाडा विभागात समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसेवकास दिला जाणारा श्री सत्यनारायण कालानी स्मृती सेवा गौरव पुरस्कार रविवारी (दि.०७) येथील अक्षदा मंगल कार्यालयाच्या सभागृहात प्रसिध्द सी.ए. विवेक गोविकुंजीजी रांदड (चेतना एम्पावर्मेंट फाउंडेशन, समाजसेवक) यांना प्रदान करण्यात येणार आहे.

सी.ए. विवेक गोविकुंजी रांदड हे व्यवसायाने सी.ए. आहेत. दोन मित्रांच्या आत्महत्येनंतर आपण समाजासाठी काय केलं पाहिजे, या उद्देशाने त्यांनी आपल्या विचारधारेच्या लोकांना सोबत घेऊन २०१२ साली चेतना एम्पावर्मेंट फाउंडेशनची स्थापना केली. या संस्थेमुळे हजारो माणसांचे मन सकारात्मक करणे व समाजामध्ये शांतता, प्रेम आणि आनंद वाढवणे. चेतना एम्पावर्मेंट फाउंडेशनच्या निमित्ताने त्यांनी अर्ध्या लाखांहून अधिक लोकांशी संवाद साधून त्यांना सकारात्मकतेची प्रेरणा दिली आहे. चेतना एम्पावर्मेंट फाउंडेशनच्या माध्यमातून समाजसेवेमध्ये ३० विविध कार्यक्रम राबवले गेले आहेत. ५४ इंजिनियर्स, ५ डॉक्टर्स व ५ सी.ए. घडून झाले आहेत. शालेय तंबाखू मुक्त करण्यासाठी ते दर्जेदार परिश्रम घेतात. त्यांनी चेतना हॉस्पिटलमध्ये २५०० झाडांचे वृक्षारोपण व १००० झाडांचे जतनकर्तृत्व केले आहे. पिस इनिटीएटीव्ह या युरोपियन संस्थे मध्ये, स्टर्गबर्ग, फ्रान्स मध्ये त्यांना २०२३ मध्ये बोलावण्यात आले. तेथे १३६ देशाचे लोक होते. तसेच त्यांना महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी समाजात्रे २०२४ मध्ये विशेष प्रतिभा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समाजसेवेमध्ये केलेल्या कार्यामुळे वर्ष माहेश्वरी २०२२, महेश भूषण (२०१८), 'हेम' फाऊंडेशन २०२२-२०२३ पुरस्कार असे अनेक सन्मान त्यांना मिळालेले आहेत.

कालानी पुरस्काराचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. हा पुरस्कार रविवार ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता शहरातील अक्षदा मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. सि. ए. विवेक गोविकुंजी रांदड यांनी समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार प्रदान करण्यासाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेश काकाणी हे राहणार आहेत. तसेच हैदराबाद येथील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व डॉ. अनुराधा जाजू यांचे मार्गदर्शन राहणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन सत्यनारायण कालानी स्मृती सेवा ट्रस्टचे अध्यक्ष घनश्याम मालपाणी, सचिव डॉ. श्रीकांत मणियार, अं. गौवर्धनदास जेथलिया, अनुप शुक्ला, ॲड. राजगोपाल माहेश्वरी, रितेश जैन, पुमचंद मुथा, ॲड अशोक सोनी, डॉ. विवेक नवंदर, ॲड रमेश शर्मा, डॉ. किशोर मंत्री, डॉ. राजमाला कालानी, डॉ. नंदकिशोर भवंस, गोविंद असमरे, अं. गोपाल डोडिया, जे.सी. सोमाणी, संदीप भंडारी, केदारनाथ सारडा, डॉ. विनोद भंडारी, बाबुलाल मोदीनी, सत्यनारायण मणियार, डॉ. जी.एम. चांडक, श्यामसुदर दरक, विजय मुंडडा, प्रा. सत्यनारायण राठी, अशोक शर्मा, डॉ. एस.एस. सोमाणी, डॉ. ओ.जे. सोमाणी, दुर्गाप्रसाद बंग, पुरणमल अग्रवाल, पंकज गंगवाल, धर्मचंद गंगवाल, संदीप भंडे, प्रदीप काबरा, श्यामसुदर गोयल, केदारनाथ चांडक, कन्हैयालाल बंग, रूपेश सोनी, सुभाष इंदानी, पवन पुरोहित, अं. मनोज तोष्णीवाल, सुनील कालानी, आशिष लोया, नितीनकुमार धूत, अनिल जैन, पंकज सोनी, कैलास झंवर, सतीश झंवर, महेश कालानी, सीए श्याम धूत, मुकेश सोमाणी, सुरेश कालानी, पवन झांजरी, सर्वेश काला, जयप्रकाश कालानी, मनोज कुचेरिया, सीए अरुणकुमार ओझा, सत्यनारायण चांडक, डॉ. निहार चांडक, अशोक जागीड, अशोक राका, नंदकिशोर मुंडडा, संतोष मणियार, संतोष अग्रवाल, अं. पवन उपाध्याय, सुनील तोष्णीवाल, श्याम कालानी, शुभम अच्छा यांनी केले आहे.

### मोहन कुटे जीवशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण



**जिंतूर,/प्रतिनिधी-** वसा येथील मोहन भगवानराव कुटे याने जीवशास्त्र विषयात राज्यस्तरीय सेट परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होऊन आपले नाव उज्वल केले आहे याच्या या यशामुळे कुटुंबीय मित्रपरिवार व शिक्षक वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे .

मोहनने कठोर परिश्रम सातत्यपूर्ण अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले सेट परीक्षा सारखी कठीण परीक्षा पार करताना त्याने दाखवलेली जिद्द आणि अभ्यास वृत्ती कौतुकास्पद आहे त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. भविष्यात आणखी मोठ्या यशाच्या शुभेच्छा राजू नागरे अविनाश काळे नानासाहेब राऊत आदींनी शुभेच्छा दिल्या.



**परभणी- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना परभणी शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी प्रा. रामेश्वर आवरगंड, शंकर भागवत, मा. नगर सेवक चांदुराम बोराडे, बबन मकासरे, सुरेंद्र रोडगे, विनोद कणकूटे, मनोहर गवारे, रामदास कदम, शेख इकबाल दावत, माही दांडगे आदी दिसत आहेत. छाया- शैलेश डहाळे, परभणी**

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाड्यामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## जिंतूर हे शहर डीजेमुक्त करणार- वाघमारे

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर मध्ये डीजे मुक्त करणार उपविभागीय पोलीस अधिकारी श्री वाघमारे साहेब जिंतूर जिंतूर येथे शांतता समितीची बैठक लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे मंगळवारी दुपारी तीन वाजता संपन्न झाली.

या बैठकीत आपले मनोगत व्यक्त करताना उपविभागीय पोलीस अधिकारी श्री वाघमारे साहेब यांनी सर्व गणेश मंडळाच्या अध्यक्षांना सूचना देण्यात आल्या की गणेशोत्सव विविध मोठ्या थाटामाटाने साजरा करा व या सणाला कुठल्याही प्रकारचे गालबोट लागू नये व कायदा सुव्यवस्था हातात कुणीही घ्यायचा प्रयत्न



करू नये तसेच गणपती समोर डीजे वाजण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे तसेच गतवर्षी जिंतूर मध्ये गणेश विसर्जन च्या मिरवणुकीमध्ये डीजे च्या आवाजामुळे एक तरुण मित्राचा मृत्यू झाला त्यामुळे जिंतूर शहरांमध्ये डीजे बाजूने डिजे वरबंदी करण्यात येत आहे तुम्ही डीजे वर खर्च करण्यापेक्षा इतर सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम घ्या त्यामध्ये खर्च करा परंतु डीजे वर अजिबात खर्च करू नका डीजे मुळे तुम्हाला व तुमच्या कुटुंबांना व इतरांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची आपण दक्षता घ्या या कार्यक्रमास शांतता बैठकीमध्ये नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी श्री दंडवते साहेब यांनी जिंतूर शहरांमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील असे त्यांनी शांतता बैठकीत जाहीर केले यावेळी जिंतूरचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी सुद्धा शहरांमध्ये ईद व गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने शांततेत पार पाडावे अशा सूचनाही त्यांनी केल्या त्या बैठकीचे सूत्रसंचालन श्री मेहेत्रे साहेब यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री पत्रकार प्रदीप कोकडवार यांनी मांनले या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक रवींद्र सिंह परदेशी उपविभागी पोलीस अधिकारी श्री वाघमारे साहेब जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे नायब तहसीलदार गायकवाड साहेब नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दंडवते जिंतूरचे प्रतिष्ठित व्यापारी ब्रिज गोपाल तोष्णीवाल व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड बालाजी सांगळे, बालाजी शिंदे मौलाना जलील यांच्यासह सर्व खात्याचे खाते प्रमुख व व्यापारी पत्रकार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 'फ्लाईट'ची नवीन ब्रँड अम्बेसेडर सान्या मल्होत्रा

नाशिक : रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेडचा एक ब्रँड असलेल्या 'फ्लाईट' ने प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री सान्या मल्होत्राला त्यांचा नवीन ब्रँड म्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. फ्लाईट हा भारतातील एक आघाडीचा कौटुंबिक फॅशन फुटवेअर ब्रँड आहे. या घोषणेसोबतच, फ्लाईटने येणाऱ्या सण आणि लग्नसराईसाठी खास डिझाइन केलेली नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. यामुळे ग्राहकांना प्रत्येक प्रसंगासाठी स्टाईलिश पर्याय उपलब्ध होतील. ही घोषणा एका दमदार ३६०- डिग्री (३६०-वशसीशश) मार्केटिंग मोहिमेला धरून आहे, जी आत्मविश्वास, वेगळेपणा आणि स्टाईलसह पुढे जाण्याचा संदेश देते. 'सर उठा, कदम बढा' या फ्लाईटच्या ब्रीदवाक्याला साजेसा असा सान्याचा प्रवास आहे. तिच्या निर्भीड वृत्तीसाठी आणि उत्साही ऊर्जेसाठी ती ओळखली जाते. या भागीदारीद्वारे, फ्लाईटचा उद्देश सर्व वयोगटातील लोकांना स्टाईलचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. फ्लाईटच्या मते, स्टाईल ही स्वतःला व्यक्त करण्याचे एक माध्यम आहे आणि त्यातून आत्मविश्वास वाढतो.

## मारुति सुझुकीने लॉन्च केली ऑल-न्यू विक्टोरिस

भारतीय एसयूव्ही सेगमेंटला नव्याने परिभाषित करत मारुति सुझुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) ने आज आपली नवीनतम एसयूव्ही विक्टोरिस लॉन्च केली. नवीन बेंचमार्क्स स्थापित करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेली विक्टोरिस हायपर-कनेक्टेड टेक्नॉलॉजी, ऑल-राऊंड सेफ्टी, भविष्यकालीन व स्लीक डिझाईन आणि रोमांचक परफॉर्मन्स यांचा अप्रतिम संगम आहे, जी खऱ्या अर्थाने एक अशी एसयूव्ही आहे ज्यात आहे 'गॉट इट ऑल'. पेट्रोल विथ स्ट्रॉन्ग हायब्रीड, ऑल ग्रिप सलेक्ट (४४) आणि सेगमेंट-फर्स्ट अंडरबॉडी टाकी डिझाईनसह पर्यावरणपूरक एस - सीएनजी तंत्रज्ञानासह उपलब्ध, विक्टोरिस आजच्या डायनॅमिक तरुणांसाठी विविध पॉवरट्रेन पर्याय देते. ग्राहक ऑल-न्यू विक्टोरिसची बुकिंग ११,००० रुपये मध्ये करू शकतात.

## एसबीआय म्युच्युअल फंडचा गुंतवणूकदार शिक्षण आणि जागरूकता उपक्रम

आपल्या रोड ट्रिपमध्ये कधी सरळसोट हायवे असतात तर कधी-कधी कठीण अडथळे येतात. तसेच गुंतवणूकीतही चढउतार असतात. बाजारपेठा अस्थिर होतात तेव्हा अनेक गुंतवणूकदारांना आपले सिस्टॅमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी) रोखण्याची किंवा थांबवण्याची इच्छा होते. ही प्रतिक्रिया तात्काळ असली तरी तज्ञ अनिश्चित कालावधीत एसआयपी थांबवल्यामुळे दीर्घकालीन मालमत्ता निर्मितीवर परिणाम पडू शकतो असा इशारा देतात.

### बाजारातील चढउतारांदरम्यान गुंतवणूकदारांनी थांबण्याचे कारण काय?

बाजारातील अस्थिरता अनेकदा भीती निर्माण करते. गुंतवणूकदारांना घसरत्या बाजारात एसआयपी सुरू ठेवल्याने आणखी नुकसान होईल, अशी भीती वाटते. थांबण्याचा मोह अल्पावधीत भांडवलाचे संरक्षण करण्याच्या इच्छेतून उद्भवतो. तथापि, ही बचावात्मक रणनीती अनेकदा गुंतवणूकदारांना कमी किमतीत खरेदी आणि चक्रवाढीच्या शक्तीचा फायदा होण्यापासून रोखून त्यांच्याविरुद्ध काम करते.

## गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर सोयगाव शहरात पोलीसांचा रूट मार्च;शांततेचे आवाहन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ सप्टेंबर - गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस तैनात झाले आहे त्यासाठी सोयगाव शहरासह तालुक्यात शांततेचे आवाहन करत बुधवारी (दि.३) सोयगाव शहरात पोलीसांनी रूट मार्च काढला यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव बस स्थानक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,जूना बाजार चौक,भवानीपूरा परिसर आदी भागातून सोयगाव पोलीसांचा रूट मार्च निघाला.यावेळी गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या काळात सोयगाव वासियांनी शांततेत गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद साजरा करण्याचे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी केले. सोयगाव शहरातील विविध भागातून हा रूट मार्च काढण्यात आला होता.यावेळी पोलीसांनी गणेश भक्तांना शांततेत गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,गजानन दांडगे,अजय कोळी,संजय सिंगल,राजू सोनवणे,बारी साहेब,कुनाल जाधव,प्रियंका बोडखे,गृहरक्षक दल गजानन गोतमारे,योगेश बोखारे,विजय चौधरी,विनोद इंगळे,कडूबा बावस्कर,ऋषिकेश काळे,राजू पिंजारी,सुनिल सोनवणे,ज्ञानेश्वर राऊत, शांताराम मिसाळ,शाकीर पठाण,शेख शकील शेख,रवींद्र सरोदे,विलास भवर,संगिता भालेराव,आरती न्हावी आदीनी रूट मार्च काढला होता. गणेशोत्सव साठी सोयगाव पोलीस स्टेशन हद्दीतील गावात कडेकोट बंदोबस्त असून २४ तास पोलीस तैनात करण्यात आले आहे सध्या स्थानिक पोलीस ठाण्याचे २५ कर्मचारी दोन अधिकारी व गृहरक्षक दल याप्रमाने सोयगाव सह परीसरातील बनोटी,तिडका,गोंदेगाव हद्दीतील गावात बंदोबस्त तैनात करण्यात आला असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी सांगितले.

# महिलांनो आपण अष्टवधानी आणि सक्षम आहात: विजया रहाटकर

## देवगिरी बँकेच्या कार्यक्रमात मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर - देवगिरी बँक कर्मचारी गणेश मंडळाने शहरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांसाठी महाआरतीचे आयोजन केले होते. याप्रसंगी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची विशेष उपस्थिती होती. गणेश मंडळाच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात महिला सक्षमीकरण, आत्मविश्वास व सुरक्षितता यावर भर देण्यात आला.या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर उपस्थित होत्या. विजयाताई रहाटकर यांनी आयोगाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेत तेरे मेरे सपने या योजनेंची सविस्तर माहिती दिली. तसेच महिला आयोगाचे कार्य कसे चालते, याचेही तपशीलवार मार्गदर्शन केले.

आपल्या प्रेरणादायी संवादात त्यांनी सांगितले की, महिलांना अष्टवधानी होण्याचे वरदान लाभले असून त्या स्वतः सक्षम आहेत. तुमची स्पर्धा स्वतःशी असावी इतरांशी तुलना नको. त्यांच्या या विचारांनी उपस्थित महिलांमध्ये आत्मविश्वास आणि प्रेरणा संचारली. या प्रसंगी बँकेच्या संचालिका जयश्री किवळेकर, डॉ. क्षमादेवी खोब्रागडे, मंगलताई वाहेगावकर, अमिता लेकुरवाळे, माजी संचालिका माधुरी अदवंत, विमालताई तळेगावकर व इतर मान्यवर महिला उपस्थित होत्या.

आपल्या संभाजीनगर शहरातील आपली एक भगिनी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विराजमान झाली. आणि इतक्या उत्कृष्ट पद्धतीने आयोगाचे कामकाज चालवते आहे याचा प्रचंड अभिमान आहे अश्या भावना बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांनी याप्रसंगी व्यक्त केल्या. आपल्या उत्कृष्ट संवादकौशल्याने शितोळे यांनी विजयाताई रहाटकर आणि उपस्थितांमध्ये संवाद घडवून आणला. या प्रसंगी बँकेचे संचालक नागनाथ काजळे, -वीं सागर विदवंस मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, रुपेंद्र कोयाळकर, तसेच कर्ज विभाग प्रमुख काशिनाथ दापके उपस्थित होते. बँकेच्या महिला कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## कन्नडमध्ये प्रकल्पप्रमाण रचनेवरील आक्षेपांची सुनावणी ८ सप्टेंबरला

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.०४ सप्टेंबर - नगरपरिषद कन्नड हद्दीतील प्रकल्पप्रमाण रचनेवर नागरिकांकडून आलेल्या आक्षेप आणि हरकतींवर आता सुनावणी होणार आहे. यासाठी नगरपरिषदेकडून नव्याने तारीख जाहीर करण्यात आली आहे. येत्या ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय, कन्नड येथे ही सुनावणी पार पडणार आहे.

यापूर्वी ४ सप्टेंबर रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती, मात्र ती पार पडली नव्हती. त्यामुळे सर्व आक्षेपधारकांना नव्या तारखेला उपस्थित राहण्याचे आवाहन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी ऋषिकेश भालेगाव यांनी केले आहे.

नगरपरिषद प्रशासनाच्या माहितीनुसार, प्रकल्पप्रमाण रचनेबाबत अनेक नागरिकांनी हरकती व आक्षेप नोंदविले होते. नियमानुसार संबंधित नागरिकांना आपली भूमिका मांडण्यासाठी सुनावणीची संधी दिली जाते. त्यामुळे ठरलेल्या दिवशी आक्षेपधारकांनी व्यक्तिगतरीत्या किंवा प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

मुख्याधिकारी भालेगाव यांनी स्पष्ट केले की, ज्या आक्षेपधारकांनी सुनावणीच्या दिवशी उपस्थित राहण्यास टाळाटाळ केली, त्यांचे आक्षेप आपोआप निकाली काढण्यात येतील. त्यामुळे सर्व नागरिकांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार सुनावणीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्मार्ट वीज मीटर बसवण्यास अडथळा निर्माण करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : स्मार्ट वीज मीटर बसवण्यास अडथळा आणून महावितरणच्या पथकास अरेरावी करणाऱ्या छत्रपती संभाजीनगरातील तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणच्या वतीने सध्या सर्व वीज ग्राहकांना अत्याधुनिक स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर बसविण्याचे काम शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सुरू आहे. ३ सप्टेंबर रोजी दुपारी बीड बायपासवरील जैन इंटरनशनल शाळेजवळच्या जबिंदा स्केअर या वसाहतीमध्ये जुने विद्युत मीटर काढून नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू होते. त्या ठिकाणी सातारा शाखेचे सहायक अभियंता संतोष सुर्वे हे त्यांच्या सहकाऱ्यांसह गेले. मात्र तेथील रहिवाशी भारती अशोक जगदाळे यांनी 'तुम्ही कुठून आलेले आहात. तुमचे इथे काय काम आहे. तुमचे शासकीय ओळखपत्र दाखवा,' अशी मोठमोठ्या आवाजात अरेरावीच्या भाषेत विचारणा केली. महावितरण कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र दाखवले असता 'हे असे हस्तलिखित ओळखपत्र बाहेर ५० रुपयात बनवून भेटतात. हे बनावट ओळखपत्र आहे. शासकीय शिक्का देखील खोटा आहे,' असे म्हणत वाद घातला. सुर्वे यांनी महावितरणच्या सहायक अभियंता वसुधा येलपुला यांना फोनद्वारे माहिती देताच त्या घटनास्थळी हजर झाल्या. त्यांनी भारती जगदाळे व त्यांच्यासोबत तेथील रहिवासी अमृतकर व आशिष यांना समजावून सांगितले. मात्र 'आम्ही विद्युत मीटर बदलू देणार नाही. तुम्हाला जे करायचे ते करा,' असे म्हणत आरोपींनी येलपुला यांनाही अरेरावी केली. विद्युत कायद्यानुसार विद्युत मीटर हे महावितरणची मालमत्ता असून, केंद्र शासनाच्या धोरणानुसारच स्मार्ट मीटर बसवण्याचे कामकाज शहरात सर्वत्र सुरू आहे. मात्र जबिंदा स्केअर येथील भारती अशोक जगदाळे, अमृतकर व आशिष या तिघांनी स्मार्ट वीज मीटर बसवण्याच्या शासकीय कामकाजात अडथळा आणला. त्यामुळे सहायक अभियंता संतोष सुर्वे यांनी सातारा पोलिस ठाणे गाठून रीतसर फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून तिन्ही आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सनातनी गणेश मंडळातर्फे व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन

### डॉ. मिलिंद पाटील यांचे विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.०३ सप्टेंबर- शहरातील काशिनाथराव जाधव पाटील विद्यालयात सनातनी गणेश मंडळाच्या वतीने व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मिलिंद पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

शिबिरात बोलताना डॉ. पाटील यांनी दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट यांसारख्या शारीरिक व्यसनांसोबतच मोबाईल आणि सोशल मीडियासारख्या मानसिक व्यसनांचीही सविस्तर माहिती दिली. व्यसनांमुळे शरीरावर होणारे परिणाम, मानसिक ताण, सामाजिक नातेसंबंधांतील बिघाड, करिअर व शिक्षणावर होणारे विपरीत परिणाम यावर त्यांनी प्रकाश टाकला.

तरुण पिढी जर व्यसनमुक्त राहिली, तरच समाज आणि राष्ट्र सुदृढ होईल, असा ठाम संदेश त्यांनी दिला. व्यसनमुक्त जीवनासाठी त्यांनी नियमित व्यायाम, सकारात्मक विचारसरणी, वाचन, छंद जोपासणे आणि वेळेचा योग्य वापर या बाबींचा आग्रह धरला.

या शिबिराला विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि अनेक मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमावेळी सनातनी गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संदेश पवार, अध्यक्ष मयूर राठोड, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख शशीन जाधव, प्रवीण अहिरे, सचिन भामरे, डी. पी. जाधव, डी. पी. गायके, दत्ता गायके, सुनीता बाविस्कर,सुनीता दापके आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रशासकीय अधिकारी भामरे यांनी मंडळाचे तसेच उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



वेरूळ येथील गुरू देव समत भद्र शाळा येथे फुलंब्री मतदार संघाच्या आ, अनुराधाताई चव्हाण यांनी सदिच्छा भेट दिली असता शाळेतील ग्रंथालय .प्रयोगशाळा. क्रीडा विभागात. स्वच्छता व विद्यार्थ्यांच्या , प्रगतीसाठी राबवलेले विविध उपक्रमाबाबत माहिती देताना शाळेचे मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर. डॉक्टर , पाटणी. शाळेतील शिक्षक आशिष सर सचिन अन्नदाते यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते याप्रसंगी आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी शाळेची प्रगती पाहून मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर व सर्व शिक्षक चे अभिनंदन करून .शासनाकडून मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध योजनेबाबत आपण निश्चित पुढील काळात मदत करू अशा आश्वासन दिले.

## जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार; सोयगाव तालुक्यात रामदास फुसे,विनोद महालपुरे दोघांना पुरस्कार जाहीर




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ सप्टेंबर

जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सन-२०२४-२५ रामदास फुसे (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा)यांना तर यंदाचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार विनोद महालपुरे(जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोंदेगाव) यांना बुधवारी दि.४) जाहीर झाला आहे.दरम्यान मागील वर्षीच्या पुरस्काराचे जिल्हा आदर्श शिक्षक रामदास फुसे यांना तर यंदाचा पुरस्कार विनोद महालपुरे यांना जाहीर करण्यात आला आहे.या पुरस्काराची वितरणचा मुहूर्त लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर होताच गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,केंद्र प्रमुख सचिन पाटील,केंद्र प्रमुख फिरोज तडवी,केंद्रप्रमुख उमेश महालपुरे, शिक्षक संघ,श्री.अमृतेश्वर शिक्षक पतसंस्था भास्कर चौधरी,किरणकुमार पाटील,रघुनाथ काटोले,कृष्णा पाटील,संदीप चौधरी,शकूर शेख,संदीप सोनवणे,विठ्ठल राठोड,पंकज रगडे,संतोष वाघ,दुर्गादास बलांडे,राजेश जंजाल,दिवाकर चोपडे,आदीसह शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. एन. आर. ढोके. सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क ३९८/२०२१५ पु तारीख २९/०९/२०२५

अर्जदार - विश्वनाथ भावराव झाल्टे वय ७७ वर्षे धंदा शेती, रा जैतापुर ता कन्नड जि. छ. संभाजी नगर (औरंगाबाद)

गैरअर्जदार: निरंक

अर्ज - वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act)

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल अॅड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे चुलते अंबादास रामचंद्र झाल्टे हे दिनांक-१०/५/२०२१ रोजी मौजे जैतापुर ता. कन्नड येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदाराची चुलती व मयताची पत्नी चंद्रकलाबाई अंबादास झाल्टे या देखील दिनांक -३१/७/२०१४ रोजी मौजे जैतापुर येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार हे मयताच्या भाऊ भावराव झाल्टे याचा मुलगा आहे. भावराव देखील मयत आहे. सोबत ग्रामपंचायत कार्यालय जैतापुर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. हे की मयतास स्वताचे मुल-बाळ नसल्याने अर्जदारा व्यातीरीक्त् ईतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांचे वडील मयत झाल्याने मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदारा व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे.

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २६/८/२०२५ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक २६/८/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

---

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०३-०९-२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **विजय तुळशीराम कदम** यांनी मोहल्ला **नारळीबाग** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **९०८/ब** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : रविंद्र तुळशीराम कदम यांचे घर** | **पश्चिम : सुनिल उत्तम मानकर यांचे घर**
**दक्षिण : आलेरखा पठाण यांचे घर** | **उत्तर : रस्ता**

आकार : पूर्व पश्चिम **१६×२७.८ = ४४४.८** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

---

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र . २५६/२०२५

अर्जदारः १. मंगलाबाई रघुनाथ सोनवणे, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. आर.एम.एस. कॉलनी, जळगांव, ता. जि. जळगांव. २. लताबाई अर्जुन शिंदे, उ. वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. खोटे नगर, जळगांव, ता. जि. जळगांव.

विरूध्द

गैरअर्जदारः १. आनंदा दौलत वखरे, उ.वय ६५ वर्षे, धंदा शेती, २. वसंत दौलत वखरे, उ. वय ६३ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. गोदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. अशोक दौलत वखरे (मयत) वारस अ. कल्पनाबाई अशोक वखरे, उ. वय ५१ वर्षे, धंदा शेती, ब. सचिन अशोक वखरे, उ. वय ३२ वर्षे, धंदा शेती, क. विशाल अशोक बखरे, उ.वय ३० वर्षे, धंदा शेती, वरील अ. ते क. रा. गोंदेगाव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. डी. आर. सुर्यवंशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत दौलत तोताराम वखरे हे दि. २८/११/२००७ रोजी गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क १ व २. व गैरअर्जदार क. १ ते ३ क. हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क १ व २ व गैरअर्जदार क. १ ते ३ क. हे मयत दौलत तोताराम वखरे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १०/१०/२०२५०

आज दि. ०३/०९/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री एन आर ठोके साहेब, सह विवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज कमांक ४२८/२०२५ पुढील तारीख २७/१०/२०२५

अर्जदार - १.कडुबाई श्रीहरी बोडखे, वय ५७ , धंदा घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २-मिराबाई शिवाजी शिंदे, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर ३-कांताबाई वाल्मीक दांडेकर, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. निमडोंगरी, ता. कन्नड, जि.छ.संभाजीनगर

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील अॅड. व्ही. के. मोहिते, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ३ यांचे वडील नामे रामचंद्र भिका मुठठे हे दिनांक १.५.१९९४ रोजी मौजे शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे वृध्दापकाळाने मयत झालेले आहे. त्यांचे आई वडील हे सन १९७० पुर्वी मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रमांक १ ते ३ यांची आई नामे शांताबाई रामचंद्र मुठठे या वृध्दापकाळाने दिनांक १९.११.२०१० रोजी मौजे शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहेत. सोबत मयतांचे ग्राम पंचायत कार्यालय शिवराई, ता. कन्नड, यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी या न्यायालयाच्या अवलोकनासाठी मुळ अर्जा सोबत अर्जदार यांनी वंशावळ देखील दिलेली आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही इंतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी तसेच नगर पालिका कार्यालयात नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब अर्जास कारण ३०.०७.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार यांनी अर्जा सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच ग्राम पंचायत कार्यालय शिवराई यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र, या न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल केलेले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक ०२/०९/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक: ०२/०९/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५८३/२०२५

संगिता नाना भुजंग

विरूध्द

निरंक

प्रकरण - वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराचे पती नामे नाना भिमराव भुजंग हे दि.२८/०१/२०१० रोजी मौजे सिध्दनाथ वाडगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार संगिता नाना भुजंग, (विवाहपुर्वीचे नाव संगिता बाबुराव शेजवळ) रा.जोगेश्वरी, ता. गंगापुर जि.औरंगाबाद ह.मु.प्लॉट नं. ३५०, एस.आर. नं. ४१/बी. स्वराज नगर, मुकुंदवाडी, औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अॅड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.०२/०९/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कनड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ४२७/२०२५ पुढील तारीख ६/१०/२०२५

अर्जदार : १ जिजाबाई बालचंद मुठठे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर २ वैशाली बद्रीनाथ चव्हाण, तय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. भांडेगांव, ता. खुलताबाद, जि. छ. संभाजीनगर ३-ज्ञानेश्वर बालचंद मुठठे, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. शिवराई, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर ४. कविता शरद मुठठे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवराई, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर ५-आदीत्य शरद मुठठे, वय १५ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्रमांक ४, रा.शिवराई, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर ६-श्लोक शरद मुठठे, वय ९ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान अ.पा.क. जन्मदाती आई अर्जदार क्रमांक ४, रा.शिवराई, ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर

- विरुध्द -

गैरअर्जदार -निरंक

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील अॅड. व्ही. के. मोहिते, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ३ यांचे वडील तसेच अर्जदार क्रमाक ४ चे सासरे व अर्जदार क्रमांक ५ व ६ यांचे आजोबा नामे बालचंद गंगाधर मुठठे हे दिनांक २६.८.२०१२ रोजी मौजे शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे वृध्दापकाळाने मयत झालेले आहे. वालचंद चे आई वडील हे ४५ वर्षापुर्वीच मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रमांक १ ते ३ यांचा भाऊ व अर्जदार क्रमांक ४ चा पती तसेच अर्जदार क्रमांक ५ व ६ यांचे वडील नामे शरद बालचंद मुठठे हे दिनांक ४.८.२०२२ रोजी मौजे शिवराई, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. सोबत मयतांचे ग्राम पंचायत कार्यालय शिवराई, ता. कत्रड, यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी या न्यायालयाच्या अवलोकनासाठी अर्जदारांनी वंशावळ दाखल केली आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी तसेच नगर पालिका कार्यालयात नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब अर्जास कारण ३०.०७.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार यांनी मुळ अर्जा सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच ग्राम पंचायत कार्यालय शिवराई यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र, या न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल केले आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सवव आज दिनांक ०२/०९/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : ०२/०९/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# आंदोलन यशस्वी झाले...

मराठा समाजाने मुंबईत पाच दिवस केलेल्या आरक्षणविषयक आंदोलनाला मोठे यश मिळाले असून, त्याबद्दल त्या समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील, त्यांचे सर्व सहकारी आणि समस्त समाजाचे अभिनंदन केले पाहिजे. त्याचप्रमाणे इतक्या गुंतागुंतीच्या विषयावर तोड़गा काढून हे आंदोलन हाताळणारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही अभिनंदन केले पाहिजे. त्यांच्या सहकाऱ्यांचेही तेवढेच कौतुक केले पाहिजे. या आंदोलनात मराठा समाजाच्या आठ मागण्या होत्या. त्यापैकी हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय जारी करणे, मराठा आरक्षण आंदोलनात सहभागी झालेल्यांविरुद्धचे गुन्हे मागे घेणे, आंदोलनातील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत तसेच नोकऱ्या देणे, प्रलंबित जात पडताळणीला मान्यता देणे आणि आंदोलकांच्या वाहनांवरील दंड मागे घेणे अशा सहा मागण्या शासनाने मान्य केल्या. सातारा संस्थान, पुणे व औंध संस्थानच्या गॅझेटियरची अंमलबजावणी करावी आणि मराठा-कुणबी एकच असल्याचा शासनादेश जारी करावा, या दोन मागण्यांसाठी महाराष्ट्र सरकारने वेळ मागून घेतला आहे. तरीही एक मात्र खरे की, मराठा आंदोलनाला फार मोठे यश मिळाले आहे. विशेष म्हणजे संवैधानिक तरतुदींच्या चौकटीत राहून आणि न्यायालयात टिकेल, अशा पद्धतीचा दिलासा मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाला दिलेला आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे. आंदोलक व सरकार अशा दोघांचेही अधिक कौतुक यासाठी केले पाहिजे की, कोणत्याही प्रश्नावर चर्चेतून तोडगा निघू शकतो, हे नव्याने सिद्ध झाले.

मराठा आंदोलक तब्बल पाच दिवस मुंबईत तळ ठोकून बसले होते. साऱ्या देशाचे लक्ष या आंदोलनाकडे लागलेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील अन्य सहकारी आणि एकूणच राज्य सरकारच्या संयमाची आणि कसबीपणाची ही कसोटी होती. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू होत्याच. त्याही स्थितीत दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी फडणवीसांना उत्तम सहकार्य केले. मंत्रिमंडळ उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांनी शासनाची बाजू मनोज जरांगे यांना समजावून सांगितली आणि तोडगा निघाला. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी ताबडतोब शासनादेश जारी करण्यात यावा, ही आंदोलकांची मागणी मान्य होऊन अवघ्या तास-दोन तासांत शासन निर्णय जारी करण्यात आला. ओबीसींच्या आरक्षणाला कुठेही धक्का न लावता मराठा समाजातील नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रे मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, हे तसे किचकट काम होते. ते मुख्यमंत्र्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय चांगल्या रीतीने केले असे दिसते. मंत्रिमंडळ उपसमितीने या विषयावर आधीच अभ्यास केलेला होता. त्यामुळे हे इतक्या लवकर होऊ शकले. हा निर्णय न्यायालयात टिकेल आणि संविधानाच्या कसोटीवरही टिकेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेला आहे. या निर्णयाचा प्रामुख्याने मराठवाड्यातील मराठा समाजाला फायदा होणार आहे. मराठवाड्यातील पाच जिल्हे (वर्तमानातील आठ जिल्हे) स्वातंत्र्यापूर्वी हैदराबादच्या निजामाच्या अख्त्यारीत होते. हैदराबाद संस्थान स्वातंत्र्य मिळाल्यावर सार्वभौम भारतीय गणराज्यात सामील झाले. त्या संस्थानचे गॅझेटियर ब्रिटिशांच्या काळात प्रकाशित झाले होते. हैदराबाद गॅझेटियर म्हणतात ते तेच. त्या गॅझेटियरमध्ये मराठा समाजाच्या नोंदी कुणबी किंवा कापू या नावाने आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा होता. हैदराबाद गॅझेटियरमधील नोंदी लक्षात घेऊ मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया शासनाने या शासनादेशातून निश्चित केलेली आहे. हैदराबाद गॅझेटियरमुळे या नोंदी शोधणे सोपे होणार आहे. एखाद्याच्या वंशावळीत कोणत्याही टप्प्यावर कुणबी अशी नोंद झालेली असेल तर त्याला विनासायास प्रमाणपत्र मिळू शकेल, अशी व्यवस्था या शासनादेशातून केली जात आहे. शिवाय, महसूल, ग्रामविकास आणि कृषी खात्यातील अधिकाऱ्यांच्या सहभागाने स्थानिक पातळीवरील समित्यांच्या मार्फत ही पडताळणी होणार असल्यामुळे तिला फार वेळ लागणे अपेक्षित नाही. आणि तरीही या समित्यांच्या कामात पारदर्शकता राखण्याचे आव्हान असेलच हे लक्षात ठेवले पाहिजे. आरक्षणाचा लाभ मराठा समाजातील गरीब, गरजू लोकांनाच झाला पाहिजे, याची काळजी घेणे ही आता त्या समाजाचे नेतृत्व करणाऱ्यांची जबाबदारी आहे. शासनालाही त्यावर लक्ष ठेवावेच लागेल.

थोडे मागे वळून पाहिले तर गेली दोन वर्षे हा विषय पेटत राहिला आहे. मराठा समाजाच्या आंदोलनाला बऱ्याच प्रयत्नांच्या नंतर आलेल्या मुंबईतल्या या यशाचा पहिला अध्याय थोडा तणावाचा होता. तरी त्याचा शेवट गोड झाला, याचे सर्वांना समाधान वाटावे. परंतु, हा विषय येथे संपलेला नाही. आता ओबीसी समाजाच्या नेत्यांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. हा विषय न्यायालयात नेण्याची तयारी सुरू झाली आहे. ओबीसींचे नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार घालण्याचा पवित्रा घेतल्याच्याही बातम्या आलेल्या आहेत. याचा अर्थ असा की, या विषयाचा दुसरा अध्याय आता सुरू झालेला आहे किंवा लवकरच होणार आहे. मागासवर्गीय समाज कोणता यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार केवळ मागासवर्गीयांसाठी असलेल्या आयोगाला असताना राज्य सरकारने व त्यातही उपसमितीने हा निर्णय कसा घेतला, असा ओबीसी नेत्यांचा सवाल आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे सांगितले जात असताना मराठा समाजाला मागच्या दाराने सवलत देण्याचा सरकारचा मनसुबा असल्याचेही त्यांना वाटते. परंतु, मुख्यमंत्र्यांनी मात्र ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असा निर्वाळा दिलेला आहे हेही तेवढेच खरे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायद्याचे पदवीधर आहेत. त्यामुळे ते उगाच असे दिलाशाचे बोलणार नाहीत. त्यांनी अभ्यास केलेला असणारच. मात्र, आता प्रश्न असा की, मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्यामुळे ओबीसी समाजाला आपल्यावर काही अन्याय होईल, अशी शंका वाटत असेल तर तिचेही निरसन राज्य शासनाला करावे लागणार आहे. त्यातून आणखीही फाटे फुटू शकतात. आरक्षण हा विषय तसाही फार गुंतागुंतीचा आहे. हा विषय न्यायालयात नेला गेला तर शतकभरापूर्वीच्या गॅझेटियरमधील संदर्भ आजच्या कसोटीवर टिकतील काय, हा प्रश्न आहेच. याचा अर्थ असा की, राज्य शासनाची कसोटी पुन्हा लागेल. पुन्हा कोर्ट-कचेरीच्या चकरा होतील. सारांश, दुसरा अध्याय हा पहिल्याच्या तुलनेत अधिक गुंतागुंतीचा असू शकेल. आजचे खरे आव्हान आहे ते आरक्षणाची अपेक्षा असलेल्या सर्व घटकांचे समाधान करण्याचे. सर्वांना आरक्षण देता येत नाही आणि दिले तरी त्यातून सर्वांचे समाधान होऊ शकत नाही. सध्याच्या काळात शिक्षण व नोकऱ्या यासाठी इतकी स्पर्धा असते की, आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र असलेल्या व्यक्तीला देखील योग्य ठिकाणी, योग्य अभ्यासक्रमाला प्रवेश मिळणे किंवा चांगली नोकरी लागणे शक्य होतेच असे नाही. ज्यांना आरक्षण नाही, त्यांचे तर सोडाच. वर्तमानातील परिस्थिती अशी आहे की, केवळ आरक्षण देऊन कोणत्याही व्यक्तीचे वा समुदायाचे उत्थान होऊ शकत नाही. लोकसंख्येतील वाढ, शिक्षणातील वाढ आणि त्या तुलनेत नोकऱ्यांची कमतरता हा तसा जुनाच विषय. तरीही काही समुदायांना-व्यक्तींना आरक्षण दिले पाहिजे, हे खरेच आहे. अनेक समुदायांना आरक्षणासह इतर सवलतींचीही गरज आहे. मराठा समाजातही सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागे असलेले लोक आहेत. त्यांना अशा सवलती मिळणे गरजेचेच आहे. मनोज जरांगे पाटील हे अशाच लोकांसाठी आंदोलन करीत आले आहेत. त्यांनी ज्या धैर्याने आंदोलन एका यशस्वी टप्प्यावर आणले, त्याचे कौतुक करावेच लागेल. या आंदोलनादरम्यान आंदोलकांवर दोषारोप झाले आणि मुख्यमंत्र्यांवरही झाले. दोन्ही बाजूंनी संयम पाळला गेला म्हणून आंदोलनाची सांगता यशस्वी स्वरूपात झाली. आता अपेक्षा एवढीच की, शासनाने मान्य केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी तत्काळ सुरू करावी आणि मराठा समाजाच्या धुरिणांनी शासनाला या निर्णयांच्या अंमलबजावणीत सहकार्य करताना गरीब-गरजूंच्या कल्याणाकडे प्राधान्याने लक्ष द्यावे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# चौकटीपलीकडचा शिक्षकी पेशा

शिक्षक म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारी व्यक्ती नाही, तर ती विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी एक शिल्पकार असते. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका अधिकच आव्हानात्मक आणि महत्त्वाची झाली आहे. विसाव्या शतकात शिक्षणाच्या कल्पना पारंपरिक होत्या. सध्याच्या तंत्रबदलत्या युगात शिक्षणाच्या कल्पना बदलत आहेत. नवे शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रशिक्षक (रोबोटिक), परदेशी विद्यापीठांचे भारतात झालेले आगमन अशा अनेक बाबींमुळे शिक्षकांना बदलावे लागणार आहे. ऑनलाईन शिकवण, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, शिक्षणासंबंधी मोबाईल ॲप्स आणि वेबसाईट्स यांचा वापर वाढला आहे. शिक्षकांना या तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करावे लागेल. पारंपरिक शिक्षणपद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा मेळ घालणे हे आजच्या शिक्षकांपुढील मोठे आव्हान आहे. म्हणूनच आजच्या युगात शिक्षकांनी कसे असले पाहिजे, याबाबत सविस्तर विचार करणे गरजेचे आहे. दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस आपल्या देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाला सलाम करण्याचा दिवस आहे. ते एक महान शिक्षक, तत्त्वज्ञ आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती होते. त्यांचे शिक्षणक्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. मात्र त्या पलीकडे जाऊन आजघडीला शिक्षकी पेशाचा विचार करणे आवश्यक आहे.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहितीचा महासागर इंटरनेटवर उपलब्ध आहे. अशा परिस्थितीत शिक्षकांनी केवळ पाठ्यपुस्तकांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही. त्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. नवीन शोध, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक आणि आर्थिक बदल याबद्दल त्यांना माहिती असणे गरजेचे आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी डिजिटल साक्षर असणे आवश्यक आहे. स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर, ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक ॲप्सचा वापर करून शिक्षण अधिक प्रभावी बनवता येते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जागतिक घडामोडींची माहिती देणे, विविध विषयांवर ऑनलाईन संशोधन करण्यास प्रोत्साहन देणे हे आधुनिक शिक्षकांचे कर्तव्य आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे होते, पण आजच्या युगात त्यांची



भूमिका ज्ञान सोपे करून सांगणे आणि विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करणे अशी झाली आहे. इंटरनेटमुळे आज माहिती सहज उपलब्ध असली तरी, त्या माहितीचे योग्य विश्लेषण करणे आणि तिचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणे महत्त्वाचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. प्रश्न विचारण्याचे, वाद-विवाद करण्याचे आणि स्वतःची मते योग्य प्रकारे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि क्षमता ओळखून कारकीर्दीचा योग्य पर्याय निवडण्यास मदत केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि पद्धत वेगळी असते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांवर खूप शैक्षणिक आणि सामाजिक दबाव असतो. परीक्षेचा ताण, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक माध्यमे आणि समवयस्कांकडून मिळणारा दबाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक ताण अनुभवतात. अशा वेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केवळ शैक्षणिकच नव्हे तर मानसिक आधारस्तंभ म्हणून काम केले पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधला पाहिजे, त्यांच्या समस्या ऐकून घेत मानसिक पातळीवर मदत केली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रोत्साहित करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे. एखादा विद्यार्थी मागे पडत असल्यास शिक्षा न करता, त्याच्या अडचणी समजून घेऊन मदत करणे आवश्यक आहे. शाळेत किंवा वर्गात सकारात्मक आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. शिक्षण केवळ चांगले गुण मिळवण्यासाठी नाही, तर एक चांगला माणूस बनण्यासाठी असते. आधुनिक युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नैतिक आणि सामाजिक मूल्यांची शिकवण दिली पाहिजे. प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, सहकार्य, इतरांचा आदर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यासारखी मूल्ये केवळ तोंडी सांगून चालणार नाही, तर शिक्षकांनी स्वतःच्या आचरणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. आपण बोलतो तसे वागतो, हे विद्यार्थी पाहतात, तेव्हा मूल्य अधिक गांभीर्याने घेतात. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये करुणा आणि संवेदनशीलता विकसित केली पाहिजे; जेणेकरून ते स्वतःचाच नव्हे तर समाजाचाही विचार करतील.

आजच्या काळात ज्ञान आणि तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःला सतत शिकत राहण्यास तयार ठेवले पाहिजे. नवीन शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम आणि अध्यापनाच्या पद्धती शिकून घेणे आवश्यक आहे. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षकच नाही, तर स्वतःही एक विद्यार्थी असतात. नवीन तंत्रज्ञान, शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा समजून घेण्यासाठी त्यांनी कार्यशाळा, प्रशिक्षण आणि चर्चासत्रांमध्ये आवर्जून भाग घेतला पाहिजे. लवचीक वृत्तीमुळे ते विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात आणि त्यानुसार आपल्या अध्यापनाच्या पद्धतींमध्ये बदल करू शकतात. शिक्षण हे केवळ ज्ञान देणारे नाही तर, विद्यार्थ्यांच्या भविष्याला आकार देणारे माध्यम आहे. शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता निर्माण करतो. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. कोणताही विद्यार्थी कमजोर नसतो, फक्त त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लहान यशाचे कौतुक केले पाहिजे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आणखी प्रयत्न करण्यासाठी प्रोत्साहित होतात. शिक्षण प्रक्रिया केवळ शाळेतच घडत नाही. ती पालक आणि समाजाच्या सहकार्याने पूर्ण होते. शिक्षकांनी पालकांशी नियमित संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल माहिती दिली पाहिजे. पालकांचे सहकार्य मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या अडचणी अधिक चांगल्या प्रकारे सोडवता येतात. याशिवाय, शिक्षकांनी समाजामध्ये होणाऱ्या बदलांची जाणीव ठेवून त्यानुसार आपल्या शिकवण्याच्या पद्धतींमध्ये बदल केले पाहिजेत. त्यांना सामाजिक समस्यांची जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे.

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र बदलायला हवे. पाया बळकट करून, प्रात्यक्षिकांवर भर देऊन, कार्यसंस्कृती अवलंबून रोजगारक्षम विद्यार्थी घडवणे हे आजच्या जमान्यात शिक्षकांचे खरे कार्य आहे. त्याचबरोबर मूल्ये, नीतिमत्ता, राष्ट्रप्रेम, सर्वसमावेशकता, संवेदनशीलताही महत्त्वाची आहे. स्वयंशिस्त आणि चांगला नागरिक घडणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मित्र आणि तत्त्वज्ञ बनले पाहिजे. त्यांनी स्वतःला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे, तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# गणेशोत्सव, आरक्षण अन् फेक नॅरेटिव्ह

'संविधानात बदल केला जाणार आहे' हा फेक नॅरेटिव्ह लोकसभा निवडणुकीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर पसरविण्यात आला. ज्यांनी हा नॅरेटिव्ह पसरविला त्यांचा हेतू त्यावेळी बऱ्यापैकी साध्य झाल्याचे दिसून आले. मुळात फेक नॅरेटिव्ह म्हणजे काय तर खोटी, दिशाभूल करणारी किंवा अर्धसत्यावर आधारित अशी माहिती की, ज्या माहितीच्या प्रसारामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांमध्ये भ्रम, भीती किंवा द्वेषभाव निर्माण होतो. खोटी माहिती लक्षित समाजापर्यंत इतक्या सुनियोजित पद्धतीने पोहोचविण्यात येते की ज्यामुळे त्या समाज गटाचा बुद्धिभ्रम होतोच होतो. याच रडीच्या डावाचा वापर करून पश्चिम विदर्भातील अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यांसह मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजामध्ये भीती निर्माण करण्यात आली. त्यात धाक दाखविण्यात आला तो आरक्षण जाण्याचा आणि त्या आधारे हिंदू संस्कृतीशी अभिन्न नातं असलेल्या आदिवासींना हिंदूंपासून तोडण्याचा हीन प्रयत्न केला गेला. दुर्दैवाने हे कारस्थान रचणाऱ्यांचा हेतू सफल झाल्याचे काही गावांमध्ये दिसून आले.

आदिवासीबहुल वस्ती असलेल्या पश्चिम विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये व्हॉटस्ॲप व तत्सम समाज माध्यमावरून अत्यंत महत्त्वाची सूचना असे उल्लेखून एक संदेश प्रसारित करण्यात आला. त्यात आदिवासी आंध समाजाच्या गाव आणि कुटुंबाची पुणे येथील एसआयटीची टीम सर्वेक्षण करणार असल्याचे म्हटले. गणपती व लक्ष्मी यांची मूर्ती कुठेही दिसू नये, कुठलीही मूर्तिपूजा करतो हे सांगू नये, आमच्या चालिरीती हिंदू धर्माशी निगडित नाहीत असे सांगावे अन्यथा आदिवासी आरक्षण संपुष्टात येईल अशी भीती त्या संदेशात दाखविण्यात आली. दुर्दैवाने अनेक ठिकाणी आदिवासी आंध समाजाचे बांधव या अपप्रचाराला बळी पडले आणि त्यांनी गणेशोत्सवाचे दहा दिवस पूर्ण होण्याआधीच घरगुती आणि सार्वजनिक गणेशाचे विसर्जन केले. खरं म्हणजे अनेक गावांमध्ये आदिवासी बांधवांनी श्रद्धेने गणेशाची स्थापना केली होती. पण आरक्षण जाण्याच्या भीतीतून त्यांनी गणेशाचे विसर्जन केले. मात्र अशी भीती निर्माण करण्याचे कारण काय? हा उद्योग केला कुणी आणि सुनियोजित पद्धतीने भ्रम निर्माण करून धार्मिक भावनेला ठेच पोहोचविणाचे पाप कोणाचे? याचा शोध घेऊन पोलिस प्रशासनासह संबंधित प्रशासकीय विभागांनी दोषींवर ठोस कारवाई करण्याची आवश्यकता आहे. सोबतच भ्रामक प्रचार असल्याचे समुपदेशन गरजेचे आहे. या समुपदेशनाकरिता केवळ शासकीय नव्हे तर सामाजिक संस्थांनी देखील पुढाकार घेणे आवश्यक आहे.

सण, उत्सव याची समृद्ध परंपरा असलेला आपला समाज आहे. सण, उत्सव केवळ कुळाचार नसून प्रत्येक चालिरीतीमागे विज्ञान आहे. पण ही समृद्ध परंपरा खंडित व्हावी नव्हे नष्ट व्हावी असे षडयंत्र फार पूर्वीपासून सुरू आहे. या षडयंत्राला परकीय बळ असल्याचे देखील अनेक वेळा समोर आले. आताही ज्या-ज्या वेळी हिंदू सण, उत्सव सुरू होतात त्या-त्या वेळी पर्यावरणासह असंख्य बाबींचे हित धोक्यात आल्याची आवई उठविणारी एक जमात पुढे येते. त्याला माध्यमातील पिवळा चष्मा घातलेले अनेक जण साथ देतात आणि परंपरेने साजरे होणारे आमचे सण, उत्सव कसे चुकीचे हे बिंबविण्याचा प्रयत्न करतात. पण गत काही वर्षांपासून त्यांचा हा डाव सफल होत नसल्याचे त्यांना दिसून आले. त्यामुळेच आता संभ्रम पसरविण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यासाठी त्यांनी लक्ष्य केले ते दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना. संभ्रम निर्माण करूनच आरक्षण जाण्याची भीती निर्माण केली गेली. त्याचा परिणाम गणेश विसर्जनात झाला.

एवढेच नव्हे तर या परिसरात श्वेतवस्त्रधारण केलेली भूते देखील सक्रिय असल्याची चर्चा दबक्या आवाजात आहे. ते गत काही वर्षांपासून त्यांना नेमून दिलेले षड्यंत्राचे काम चोख बजावत असल्याची देखील माहिती आहे. त्यांच्या षडयंत्रात अनेक कुटुंबे अडकले असून या कुटुंबांनी देव-धर्मासह पारंपरिक चालिरीती बदलल्या आहेत. ही अत्यंत गंभीर बाब असून समाजातील सजग प्रहरींसाठी आव्हान आहे. वास्तविक समाजात द्वेषभाव निर्माण होईल अशी अफवा पसरविणे कायद्याने गुन्हा आहे. हा गुन्हा करणारे गुन्हेगार मात्र ठिकठिकाणी दहा दिवसांपूर्वीच झालेल्या गणेश विसर्जनाचा असुरी आनंद घेत आहेत. ज्या आदिवासी बंधूंच्या धार्मिक भावनेशी अफवा पसरवून खेळ करण्यात आला त्या आदिवासी बंधूंनी आता पुढाकार घेऊन शासनाकडे संविधानानुसार कारवाईची मागणी करावी. सज्जनशक्तीने त्यांच्या मागणीला आवश्यक ते बळ द्यावे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# निवडणूक उपराष्ट्रपतींची, राज्यसभा अध्यक्षांची

दि. ९ सप्टेंबरला म्हणजे पुढील आठवड्यात उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होत आहे. रालोआचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात ही लढत होत आहे. यावेळची उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक दक्षिण भारतातील दोन उमेदवारांमध्ये होत आहे. यातील राधाकृष्णन् हे महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल तर सुदर्शन रेड्डी हे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आहेत.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत फक्त लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांनाच मताधिकार असतो. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांसोबत देशातील सर्व राज्यांतील विधानसभा तसेच विधान परिषदेच्या आमदारांनाही मतदानाचा अधिकार असतो. या निवडणुकीत संख्याबळाच्या आधारावर राधाकृष्णन् यांचा विजय निश्चित मानला जात आहे. उपराष्ट्रपतिपद हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे घटनात्मक पद आहे. राष्ट्रपतींनंतर उपराष्ट्रपतिपदाचे घटनात्मक महत्त्व आहे. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्षही असतात. लोकसभेचे सभापती हे लोकसभेवर निवडून आलेले असतात. मात्र राज्यसभेचे अध्यक्ष हे राज्यसभेवर निवडून आलेले नसतात.

उपराष्ट्रपतिपदाचे दोन्ही उमेदवार सध्या प्रचारात व्यस्त आहेत. विविध राज्यांच्या राजधानीत जाऊन विविध प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांच्या तसेच खासदारांच्या भेटी घेत आहेत. दोन आघाड्यांच्या उमेदवारांत ही निवडणूक होत असल्यामुळे सामान्यपणे कोणता पक्ष कोणत्या उमेदवाराला मतदान करणार, याचा अंदाज करणे कठीण नाही. खरी चुरस आहे, ती रालोआ आणि इंडिया आघाडीत नसणाऱ्या पक्षांना आपल्या बाजूला ओढण्याची. मात्र यातही रालोआने बाजी मारली आहे. रालोआत नसणाऱ्या अनेक प्रादेशिक पक्षांनी राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. रालोआ आणि इंडिया आघाडीतील पक्ष ठरलेले असल्यामुळे दोन्ही बाजूच्या मतदारांची संख्या जवळपास निश्चित आहे, त्यामुळे त्यापेक्षा कमी मते एखाद्या आघाडीच्या उमेदवाराला पडली तरी त्यांची मते फुटली, असे मानता येईल. मते फुटण्याचा सर्वाधिक धोका इंडिया आघाडीच्या उमेदवाराला आहे. राधाकृष्णन् हे महाराष्ट्राचे राज्यपाल असल्यामुळे महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांनी महाराष्ट्राची अस्मिता म्हणून त्यांना मतदान करावे, असे आवाहन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि शिवसेना उबाठाचे उद्धव ठाकरे यांना करत राजकीय मुत्सद्देगिरीचे दर्शन घडवले होते. या दोन्ही नेत्यांनी फडणवीस यांची विनंती फेटाळली असली तरी एखादा चमत्कार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे इंडिया आघाडीतील काही पक्षांनी आणि त्यांच्या खासदारांनी राधाकृष्णन् यांना मतदान केले तर आश्चर्य वाटून घेण्याचे कारण नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला आपल्या मतदारांसाठी पक्षादेश (व्हीप) जारी करता येत नाही. सर्व पक्षाच्या मतदारांना सद्सदविवेकबुद्धीने मतदान करावे लागते. त्यामुळेच या निवडणुकीत मते फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे उपराष्ट्रपतिपदावर सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचे भाग्य आतापर्यंत देशातील दोन नेत्यांना लाभले. पहिले म्हणजे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् आणि दुसरे म्हणजे मोहम्मद हमीद अन्सारी. डॉ. राधाकृष्णन् हे देशाचे पहिले उपराष्ट्रपती होते. १९५२ ते १९६२ असे सलग दोन कार्यकाळ ते उपराष्ट्रपती होते. नंतर ते राष्ट्रपतीही झाले. मोहम्मद हमीद अन्सारी २००७ ते २०१७ या काळात उपराष्ट्रपती होते.

उपराष्ट्रपतिपदाचा विचार केला तर आतापर्यंत भाजपाचे तीनच नेते या पदावर विराजमान झाले. भैरोसिंग शेखावत हे भाजपातून उपराष्ट्रपती झालेले पहिले नेते होते, व्यंकय्या नायडू हे भाजपाचे दुसरे नेतेही उपराष्ट्रपती झाले होते. जगदीप धनकड हे उपराष्ट्रपतिपदाची शपथ घेणारे तिसरे नेते होते. आता राधाकृष्णन् हे भाजपाचे चौथे उपराष्ट्रपती ठरणार आहेत. यातील गंमत म्हणजे भाजपाचा एकही उपराष्ट्रपती हा राष्ट्रपती झाला नाही. राष्ट्रपती होण्याचे भाग्य भैरोसिंह शेखावत, व्यंकय्या नायडू आणि जगदीप धनकड यांना लाभले नाही. धनकड यांना तर अर्ध्यातच उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा द्यावा लागला. आता राधाकृष्णन् यांच्या नशिबात राष्ट्रपतिपद आहे का, हे काळच सांगणार आहे. उपराष्ट्रपती होणारे व्यंकय्या नायडू हे भाजपाचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष होते. यानंतर भाजपाचा कोणताही राष्ट्रीय अध्यक्ष उपराष्ट्रपती होऊ शकला नाही.

उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन् हे भाजपाचे दक्षिण भारतातील दुसरे नेते ठरणार आहेत. याआधी व्यंकय्या नायडू हे दक्षिण भारतातील भाजपाचे नेते उपराष्ट्रपती झाले होते. त्यामुळे भाजपाला मिळालेल्या उपराष्ट्रपतिपदातील दोन नेते उत्तर भारताचे तर दोन नेते दक्षिण भारताचे होते, असे म्हणायला हरकत नाही. भैरोसिंह शेखावत आणि जगदीप धनकड हे उत्तर भारतातील नेते म्हणावे लागतील. योगायोग म्हणजे शेखावत आणि जगदीप धनकड हे दोघेही राजस्थानचे होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा कार्यकाळ संपणार असल्यामुळे २०२७ मध्ये राष्ट्रपतिपदाची निवडणूक होणार आहे.

उपराष्ट्रपतिपदावरून राष्ट्रपतिपदावर बढती मिळालेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हे पहिले नेते होते. त्यानंतर झाकिर हुसेन, व्ही. व्ही. गिरी हे उपराष्ट्रपतीही नंतर राष्ट्रपती झाले. आर. व्यंकटरमण, डॉ. शंकरदयाल शर्मा आणि के. आर. नारायणन् या तीन उपराष्ट्रपतींनाही नंतर राष्ट्रपतिपदावर विराजमान होण्याचे भाग्य लाभले. तर मोहम्मद हिदायतुल्लाह आणि बी. डी. जत्ती या दोन उपराष्ट्रपतींनाही काळजीवाहू राष्ट्रपती होण्याचे भाग्य लाभले. हिदायतुल्लाह जवळपास एक महिना काळजीवाहू राष्ट्रपती होते. बी. डी. जत्ती ११ फेब्रुवारी १९७७ ते २५ जुलै १९७७ या काळात कार्यवाहक राष्ट्रपती होते. १९९२ ते ९७ या काळात नारायणन् उपराष्ट्रपती होते, त्यानंतर म्हणजे १९९७ नंतर हे भाग्य कोणत्याही उपराष्ट्रपतींना लाभले नाही. लोकसभेच्या ५४३ तर राज्यसभेच्या २३३ आणि १२ नामनियुक्त अशा २४५ मिळून एकूण ७८८ सदस्यांना या निवडणुकीत मतदानाचा अधिकार आहे. यापैकी लोकसभेतील एक तर राज्यसभेतील ५ अशा सहा जागा रिक्त आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष ७८२ सदस्य मतदानाचा अधिकार बजावणार आहेत. त्यामुळे ३९२ मते ज्या उमेदवाराला मिळतील, तो विजयी होणार आहे. यात रालोआजवळ दोन्ही सभागृहात ४२२ खासदार आहेत. यात लोकसभेतील २९३ आणि राज्यसभेच्या १२९ सदस्यांचा समावेश आहे. इंडिया आघाडीजवळ ३१२ मते आहेत. यात लोकसभेतील २३४ आणि राज्यसभेतील ७८ सदस्यांचा समावेश आहे. दोन्ही आघाडीत नसणाऱ्या तिसऱ्या आघाडीचे संख्याबळ ४८ आहे. यात लोकसभेतील १४ तर राज्यसभेतील ३४ सदस्यांचा समावेश आहे. संख्याबळाचा विचार करता रालोआच्या उमेदवाराला किमान ४५० मते मिळतील, असा अंदाज आहे. त्यामुळे राधाकृष्णन् देशाचे नवे उपराष्ट्रपती होणार हे नक्की आहे.

९८८१७१७८१७

### उत्सव आणि पर्यावरण

भारतीय संस्कृती अनमोल आहे. या संस्कृतीत वर्षभर सण, उत्सव, परंपरा जपल्या जातात आणि त्या अनुषंगाने पर्यावरण संवर्धनही आपोआप साध्य होते. प्रत्येक देवाचे आवडते फूल असते. त्यांच्या पूजनासाठी पत्री असतात. प्रत्येक सण उत्सवाचे अनन्यसाधारण महत्त्व आहेच. निसर्गातील प्रत्येक घटक तेवढाच महत्त्वाचा आहे अशी आपली संस्कृती आहे. हाच एक महत्त्वाचा संदेश या सण उत्सवात आहे

गणेशोत्सव, नवरात्र, रामनवमी, जन्माष्टमी असे अनेक उत्सव आनंदात, जल्लोषात आणि भावभक्तीने साजरे केले जातात. पण या निमित्ताने होणारा महाप्रसाद, शोभायात्रा आटोपली की पर्यावरणाला धोका निर्माण होतो. सर्वत्र निर्माल्य, वाया गेलेले अन्न आणि कचऱ्याचे ढीग यामुळे उत्सवाला गालबोट लागते. प्रत्येक व्यक्तीने आणि मंडळाने आपली जबाबदारी ओळखून कचऱ्याचे योग्य नियोजन केले पाहिजे. अन्न वाया जाऊ नये इतकेच ताटात घ्यावे. अन्न उरले असल्यास योग्य व्यक्तींपर्यंत पोहचवावे. निर्माल्याचे खत करून बागेत, शेतात वापरावे. त्यापासून बरेच लघुउद्योग पण करता येतात, जे पर्यावरण संवर्धन करू शकतात. तलाव, नद्या, समुद्र यात मूर्ती, निर्माल्य टाकून निसर्ग सौंदर्याला बाधा आणू नये इतकी काळजी घ्यायला हवी. तरच निसर्ग आणि परमेश्वर देखील आपोआपच प्रसन्न राहून आशीर्वाद देईल हे निश्चित.

**संगीता वाईकर**/९१२२५०४७९४

### ओबीसींच्या हक्काची खरी लढाई

मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर सरकारने हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. मात्र मराठ्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश झाल्यास कुणबी व ओबीसी समाजाचे नुकसान होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे ओबीसी संघटनांचा विरोध कायमअसून संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे. ओबीसींवर सतत अन्याय होत असून सरकारी नोकरभरतीतील भेदभाव, खाजगीकरण, अपुरी शिष्यवृत्ती, तसेच 'नॉट फार सुटेबल' या कारणाखाली आरक्षणाची गळचेपी सुरू आहे. बिहारसारख्या राज्यांनी जातनिहाय जनगणना करून लोकसंख्येनुसार आरक्षण दिले, तर

## वाचक पत्रे

दक्षिण भारताने ५० टक्क्यांवरील मर्यादा ओलांडून ती नवव्या अनुसूचित टाकली. महाराष्ट्र मात्र या बाबतीत मागे आहे. खरा तोडगा फक्त दोनच आहेत -जातनिहाय जनगणना आणि ५० टक्के मर्यादा हटविणे. मराठ्यांचा ओबीसी आरक्षणात समावेश अशक्य आहे. त्यामुळे समाजाने गोंधळाला बळी न पडता, एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी लढा दिला पाहिजे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### शिक्षकी पेशा; एक व्रत

शिक्षकी पेशा म्हणजे केवळ एक नोकरी नसून ते एक व्रत आहे जे प्रत्येक शिक्षकाने संपूर्ण श्रद्धेने आणि जबाबदारीने स्वीकारलेले असते. 'कि घेतले न हे व्रत आम्ही अंधतेने' या ओळीतून शिक्षकाच्या समाजाप्रति जबाबदारीची व समर्पणाची भावना व्यक्त होते. हा पेशा स्वीकारण्यासाठी एका शिक्षकाने देखील डॉक्टर, इंजिनीयर, वकील यांच्याप्रमाणे स्वतंत्र व विशेष असे शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले असते. त्यानंतरच प्रत्येक शिक्षक स्वतःला ज्ञानाचा दीप म्हणून विद्यार्थ्यांपुढे उभा करतो आणि नंतर हा दीप स्वतः आयुष्यभर जळून इतरांना प्रकाश देतो व मार्ग दाखवतो. कुंभाराप्रमाणे शिक्षक ओल्या मातीच्या गोळ्याप्रमाणे असलेल्या लहान अबोध बालकांना घडवून सुबक आकार देऊन त्यांचे भविष्य घडविण्याचा प्रयत्न करतो. शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण करतो आणि त्यांना भविष्यासाठी तयार करतो. एक चांगला शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवायला शिकवतो. हीच खरी शिक्षकाच्या आयुष्याची व्याख्या आहे.

भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. या दिवशी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांचे योगदान आणि त्यांचा सन्मान केला जातो. शिक्षकांच्या समर्पणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता निर्माण व्हावी, त्यांचे योगदान लक्षात राहावे म्हणून हा खास दिवस असतो. शिक्षक समाजाची मूलभूत प्रेरक शक्ती असतो. शाळा, गाव, शहर जिथे कुठे असो, शिक्षक आपल्या शिष्यांना घडवताना स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार करत नाहीत. संस्कार, शिस्त, मेहनत आणि प्रामाणिकपणा शिक्षक स्वतःच्या जीवनातून विद्यार्थ्यांना शिकवतात. नव्या पिढीला घडवताना ते अनेकदा स्वतःच्या आयुष्यातील अडचणीही बाजूला ठेवतात. त्यांच्या मार्गदर्शनाने अनेक डॉक्टर, इंजिनीयर, वकील, नेता, शास्त्रज्ञ घडतात. शिक्षक म्हणजे शिक्षणाची आणि चारित्र्य जडणघडणीची एक कार्यशाळा असते. जेव्हा समाज शिक्षकी पेशाकडे आदराने पाहतो, तेव्हा समाजाची नवी दिशा निश्चित होते. शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर ते विद्यार्थी घडवतात. संस्कारांची मशाल त्यांच्या हातात असते. डिजिटल युगात विद्यार्थ्यांना नानाविध माहिती सहज मिळते, पण योग्य विचार करायला शिकवणे हे काम एक शिक्षकच करू शकतो. शिक्षकी पेशात शिक्षकांनी जे व्रत घेतले आहे ते अंधतेने नव्हे, तर दृढ विश्वासाने, सेवाभावाने, कर्तव्यभावनेने आणि विवेकाने घेतलेले असते. यात विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविण्याच्या ठाम निर्धार असतो. देशाच्या भावी नागरिकांना ज्ञानाचा, संस्कारांचा आणि प्रेरणेचा प्रकाश देण्याचे हे व्रत आहे.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अथर्वशीर्ष पठणातून सकारात्मक ऊर्जा निर्माण होते–ह.भ.प.विनायक महाराज पाटांगणकर

### बीडमध्ये के.एस.के.महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ सप्टेंबर**

अथर्वशीर्षाच्या उच्चाराने वातावरणामध्ये एक वेगळीच सकारात्मक भक्तीमय ऊर्जा निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून व आपली भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन होण्याकरिता असे उपक्रम आवश्यक आहेत, असे प्रतिपादन ह.भ.प.विनायक पाटांगणकर यांनी केले.

बीड येथील के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण गुरुवारी (दि.४) सकाळी ११ वाजता पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे अतिथी म्हणून ह.भ.प.विनायक महाराज पाटांगणकर हे बोलत होते. याप्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

बालरंगभूमी परिषद शाखा बीड तर्फे गणेश उत्सवाचे औचित्य साधून लहान मुलांवर उत्तम संस्कार व्हावेत या उद्देशाने अथर्वशीर्ष पठणाचा उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. निलमताई शिर्के-सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे. कार्यक्रमाची सुरुवात देवकी नामदेव साळुंके व स्वराली नामदेव साळुंके यांच्या पंचरत्न स्तोत्र गायनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण केले. पठणानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. अथर्वशीर्ष पठणासाठी मार्गदर्शक म्हणून गौरी गणेश कुलकर्णी, जान्हवी गिरीश देशपांडे, प्रा.अनिता वैद्य व संस्कृत अध्यापिका खके यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव साळुंके यांनी केले, तर आभार डॉ.अनिता शिंदे यांनी मानले. यावेळी दुष्यंता रामटेके, अनुराधा चिंचोलकर, अमित गाडे, दीपक जमधाडे, विजय राख, राहुल सोनवणे, सुरेश थोरात, इंद्रजीत भांगे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**विविध शाळेतील २७५ विद्यार्थ्यांचा सहभाग**

बीड शहरातील संस्कार विद्यालय, चंपावती विद्यालय, सावरकर विद्यालय, यशवंत विद्यालय, रामतीर्थ कुंड विद्यालय, सरस्वती विद्यालय तेलगाव, छत्रपती शाहू विद्यालय, आयकॉन इंग्लिश स्कूल, नवगण विद्यालय, गजानन विद्यालय राजुरी आदी शाळांमधील सुमारे २७५ विद्यार्थ्यांनी सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# दिमाखदार सोहळ्यात शारदा प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे आज मान्यवरांच्या शुभहस्ते होणार वितरण

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.४ सप्टेंबर**

शारदा प्रतिष्ठानच्या १७ व्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे आज दिमाखदार सोहळ्यात वितरण होणार आहे. सुप्रसिद्ध विचारवंत तथा व्याख्याते इंद्रजित देशमुख, शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित, गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह मान्यवर याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाला शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शारदा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघातील गुणी गुरुजनांचा गौरव व्हावा, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या शिक्षकांना पुरस्कार देवुन त्यांना भरीव काम करण्याची उर्जा मिळावी आणि इतरांना या पासुन प्रेरणा मिळावी यासाठी शारदा प्रतिष्ठान, गेवराई या सामाजिक स्वयंसेवी संस्थेकडुन मागील सोळा वर्षापासुन आदर्श शिक्षकांना पुरस्कार देवुन त्यांचा गौरव करण्याचे काम होत आहे. दरवर्षी शिक्षक दिनी या पुरस्काराचे वितरण नेत्रदिपक सोहळ्यात केले जाते. प्रतिष्ठानच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांना शैक्षणिक क्षेत्रात मानाचे स्थान आहे. यावर्षी शारदा प्रतिष्ठानच्या सतराव्या आदर्श शिक्षक पुरस्कारांची घोषणा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केली. जि.प.प्रा.शाळा, धुमेगांव येथील सहशिक्षक विठ्ठल देशमुख, जि.प.प्रा.शाळा, मोरे वस्ती, राजपिंप्री येथील सहशिक्षक कैलास पट्टे, जि.प.प्रा.शाळा, गुळज येथील सहशिक्षक भगवान मोरे, जि.प.प्रा.शाळा, हिवरा बु., ता. माजलगांव येथील सहशिक्षक ओमप्रकाश आगे, जि.प.प्रा.शाळा, सांडरवण, ता. बीड येथील सहशिक्षक बबन नांदे, जि.प.प्रा.शाळा, पाचेगांव येथील सहशिक्षिका पुष्पांजली दुधाळ, जि.प.प्रा.शाळा, मारफळा तांडा येथील सहशिक्षक विश्वभुषण सोनवणे, जि.प.माध्यमिक शाळा, तलवाडा येथील सहशिक्षक सतिष खेडकर, शारदा विद्या मंदिर, गेवराई येथील सहशिक्षक दादाराव काकडे, जि.प.माध्यमिक उर्दु (मुलींची) शाळा, गेवराई येथील सहशिक्षक महंमद इलियास आणि विशेष शिक्षक म्हणुन जि.प.प्रा.शाळा, केकतपांगरी येथील सहशिक्षक डॉ. तात्यासाहेब मेघारे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाले आहेत.

शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या औचित्याने सकाळी १०:३० वा. गोदावरी सभागृह, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सोहळ्यात सुप्रसिद्ध विचारवंत तथा व्याख्याते इंद्रजित देशमुख यांची मुख्य उपस्थिती राहणार आहे.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी बाळासाहेब जाधव यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.४ सप्टेंबर**



केज तालुक्यातील उमरी या गावचे रहिवाशी बाळासाहेब मधुकर जाधव यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)या पक्षाच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी निवड झाली आहे.

याबाबतीत सविस्तर वृत्त असे की केज येथील शासकीय विश्राम ग्रह येथे दिनांक १२ रोजी दुपारी ३ वाजता ,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)या पक्षाची बैठक संपन्न झाली. बैठकीप्रसंगी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी बाळासाहेब मधुकर जाधव यांची निवड करण्यात आली.ही निवड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ)निकाळजे यांच्या आदेशाने व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.या निवडीमुळे बाळासाहेब जाधव यांच्यावर शुभेच्याचा वर्षाव होत आहे.

या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे, मराठवाडा प्रवक्ता ज्ञानेश्वर गिरी, मराठवाडा संपर्कप्रमुख सौ आम्रपाली गजेशिव,महिला केज तालुका अध्यक्ष बचुटे मॅडम,महादेव केदार,किरण कसबे,विशाल नवगिरे,आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) हा पक्ष अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात लढणारा आणि रस्त्यावर उतरून न्याय मागणार आहे, या पक्षाचे नेते आदरणीय दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारा हा पक्ष आहे. विनाकारण कोणत्याही समाजावर अन्याय अत्याचार झाला तर हा पक्ष पूर्ण ताकतीने रस्त्यावर उतरेल, माझी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी निवड केल्याबद्दल राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ)निकाळजे व मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे यांचे मनापासून आभार व्यक्त करतो. बाळासाहेब जाधव (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख)



भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्षपदी फेर निवड झाल्याबद्दल चंपावती नागरी बँकेचे ज्येष्ठ संचालक रमेश गंगाधरे यांनी नवनाथांना शिराळे पाटील यांचा भाजप कार्यालयामध्ये सत्कार केला यावेळी मधू धांडे जावळे साहेब कलीम भैया योगेश नाकाडे इत्यादी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# सामाजिक क्रांती करणारा गणेशोत्सव – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ सप्टेंबर**

कोरडे गणपती हा नवसाला पावणारा असून नवगण राजुरी, नामलगाव आणि कोरडे गणपती हे भाविकांचे श्रद्धास्थान आहेत. सामाजिक क्रांती करणारा गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरू केला असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

गणेशोत्सवानिमित्त गुरूवार दि.३ रोजी शहरातील वीरशैव गणेश मंडळ, श्री संस्थान कोरडे गणपती, नवरंग गणेश मंडळ, राष्ट्रीय गणेश मंडळ, शिवनेरी गणेश मंडळ, रूद्रा गणेश मंडळ, सिद्धीविनायक गणेश मंडळाची आरती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आली तसेच विविध गणेश मंडळाच्या देखाव्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अरूण डाके, गणपत डोईफोडे, अशोक लोढा, सुभाष क्षीरसागर आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, कोरडे गणपती येथे आगळावेगळा उपक्रम राबवून गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. गणेशाच्या मंदिरात केलेली प्रार्थना वाया जात नाही. श्रीगणेशाला छप्पन भोग दाखवण्यात आला. गणेशोत्सव गेल्या ६६ वर्षांपासून साजरा होत असून शहरात विविध गणेश मंडळे, धार्मिक इतिहासाचे देखावे साजरे करीत आहे. वीरशैव गणेश मंडळ सामाजिक आणि पुण्याचे काम करत आहे. गणेशोत्सवानिमित्त सामाजिक, उद्योगक्षेत्रातील लोकांना पुरस्कार सुरू केले. यात शिवशंकर रामलिंग कोरे व आई सामाजिक प्रतिष्ठान यांचा समावेश असून भारत भंडारे यांना युवा उद्योग पुरस्कार देण्यात आला. तसेच अमित शिराळे यांनाही गणेश मंडळाच्या वतीने युवा उद्योजक पुरस्कार देण्यात आला. काळे गल्ली येथे प्रा.जगदीश काळे यांच्या ७३वा वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महिला, पुरूषांची उपस्थिती होती.

# शैक्षणिक कार्य करणाऱ्या मान्यवरांचा जिल्हा पत्रकार संघाकडून होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.४ सप्टेंबर**

बीडजिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या स्वरुपाचे उत्कृष्ट कार्य करणार्या काही मान्यवरांचा बीड जिल्हा पत्रकार संघाकडून सन्मान केला जाणार आहे. यामधील सत्कारमुर्तींच्या नावाची घोषणा शिक्षक दिना निमित्त करण्यात आली आहे. या सर्व पुरस्कारांचे वितरण पुढील आठ दिवसात मान्यवरांच्या हस्ते केले जाईल.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे आणि बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर यांच्या मान्यतेने सत्कारमुर्तींची निवड आली असल्याचे संयोजन समितीचे अध्यक्ष नितीन क्षीरसागर यांनी सांगितले आहे. उत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून ट्विंकलिंक स्टार स्कुल बीड यांची निवड करण्यात आली आहे. शिक्षक पतसंस्थेचा पुरस्कार विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्था आष्टी यांना देण्यात आला आहे. लोकसहभागातून शाळेचा सर्वांगिण विकास केल्याबद्दल जि.प.कें.प्रा.शा.शिराळा ता.आष्टी यांचा सन्मान होणार आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्रात ६५ दिवसात २२१ शाळेमध्ये १ लाख ६० हजार वह्यांचे वाटप केल्याबद्दल सौ.सिमा ओस्तवाल यांचाही सन्मान होणार आहे. या शिवाय वैयक्तीक पुरस्कारामध्ये सुशिल उचले (प्रशासन विभाग)प्रा.दिनकर थोरात (क्रीडा ),गिरीष भावले (संगित),लक्ष्मीकांत दोडके (नाट्य),शरद शेजाळ (इंग्लिश स्कुल),)मौलाना अब्दुल हादी (मदरसा),अमोल जोशी (वेद शाळा),सुशिल पवार(आश्रमशाळा), देवीदास डोळे (संस्कृत),डॉ.अशोक घोडके (अबॅकस),,सौ.दिप्ती देशमुख(स्काऊट-गाईड),भालचंद्र देशमुख( खाजगी कोचिंग क्लासेस),दिलीप कुलकर्णी (अंध विद्यालय),गंगाधर देशमुख(कौशल्य विकास),सौ.ज्ञानेश्वरी घाडगे (मुलींचे वस्तीगृह),श्रीमती राधा तांबे (योग शिक्षीका),धर्मनाथ शिंदे (जीवन गौरव),सौ.शितल काळदाते (आदर्श ग्रामीण शाळा),अंजली खोबरे (चित्रकला), बिभीषण चाटे (महाविद्यालय),श्रध्दा पिंगळे - धांडे (इंग्रजी प्ले ग्रुप), दत्तात्रय क्षीरसागर (बुध्दीबळ), कल्पना मुंडे (करिअर ॲकडमी), मैथिली मिरगणे (इंग्रजी शाळा), अमोल पुरी (वक्तृत्व), बाळासाहेब कळसाने (ग्रामीण शिक्षण) यांचा समावेश आहे.

# शेतकऱ्यांनो, १४ सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणी पूर्ण करा ! – जिल्हा प्रशासनाचे आवाहन

खरीप हंगाम २०२५-२६ साठी सुरू असलेली ई-पीक पाहणी मोहीम अजूनही मंद गतीने सुरू असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे . जिल्ह्यात एकूण २१ लाख ८६ हजार ५४८ प्लॉट्स पाहणीस पात्र आहेत ; त्यापैकी केवळ ४ लाख १ हजार १७८ प्लॉट्स (१८.३५ टक्के) नोंदवले गेले आहेत .

छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर , बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी वेळोवेळी शेतकऱ्यांना आणि प्रशासनाला आवाहन करून पाहणी वेगाने करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत .

शेतकरी यांच्या स्तरावर नोंदणीची अंतिम तारीख १४ सप्टेंबर २०२५ असून , त्यानंतर सहायक यांच्या मार्फत नोंदणी होऊ शकते.

ई-पीक पाहणी ४.०.० ॲप हे सोपे आणि उपयुक्त : हे ॲप प्ले स्टोअरवर उपलब्ध असून ते अपडेट करून घेणे आवश्यक आहे . शेतकऱ्यांनी गट क्रमांक , खाते क्रमांक व पीक तपशील भरून शेतातील फोटो अपलोड करायचा असतो . नोंदणी झाल्यानंतर पावती जतन करता येते . ही नोंदणी शेतकऱ्यांच्या पीक विमा , कर्ज , शासकीय अनुदान आणि खरेदी प्रक्रियेसाठी अत्यावश्यक आहे.

पीक पाहणी टप्प्याटप्प्याने कशी कराल :

१. मोबाईलवर ई-पीक पाहणी ४.०.० ॲप डाउनलोड / अपडेट करा .

२. लॉगिन करून गट क्रमांक आणि खाते क्रमांक प्रविष्ट करा .

३. पिकाचे नाव व क्षेत्रफळ भरा .

४. शेतातील थेट फोटो काढून अपलोड करा .

५. माहिती तपासून नोंदणी सबमिट करा .

६. नोंदणी पूर्ण झाल्यावर पावती डाउनलोड करून जतन करा .

तालुकानिहाय स्थिती (दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत ) : केज तालुका आघाडीवर असून येथे ३३.५८% नोंदणी (९३,४१४ प्लॉट्स / ४६,६७० हेक्टर) झाली आहे . माजलगाव - ३०.३५% , अंबाजोगाई - ३१.५६% , परळी - २९.०३% , वडवणी - २०.३% इतकी नोंदणी झाली आहे . बीड तालुक्यात सर्वाधिक पात्र प्लॉट्स (३.८७ लाख) असून त्यापैकी फक्त १४.८५% (५७,८५० प्लॉट्स) ची नोंद झाली आहे . आष्टी (४.३८%) , पाटोदा (६.५२%) , शिरूर (११.७७%) या तालुक्यांमध्ये नोंदणी अत्यल्प आहे . एकूण जिल्ह्यात २,५३,८६८ हेक्टर क्षेत्र नोंदवले गेले असून हे एकूण क्षेत्रफळाच्या केवळ १८.३५% इतके आहे.

ई पीक पाहणीचे फायदे व प्रशासनाचे आवाहन : निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्पष्ट केले की , ई-पीक पाहणी नोंदणी म्हणजे फक्त औपचारिकता नाही . भरपाई , पीक कर्ज , अनुदान , शासकीय खरेदी यासाठी ही नोंदणी अत्यावश्यक आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले , शेतकरी बांधवांनी अंतिम तारखेपूर्वी नोंदणी पूर्ण करावी . अडचण आल्यास ग्रामपंचायत , कृषी सहाय्यक किंवा महसूल अधिकारी यांच्याकडे त्वरित संपर्क साधावा.

ई-पीक पाहणी म्हणजे शेतकऱ्यांच्या हक्काची नोंद आहे . ही नोंदणी शेतकऱ्यांचे पीक सुरक्षित ठेवते , योग्य दर मिळवून देते आणि भविष्यासाठी संरक्षणाची हमी देते.

# परळीतील चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्या–अक्षय भुंबे

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) ची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.४ सप्टेंबर**



परळीच्या रेल्वे स्थानक परिसरात शनिवारी एस.सी.समाजाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराणे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्या, पिडीत कुटुंबाचे पुनर्वसन करा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांच्यासह शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवार, दिनांक ३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक व उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मंगळवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री पंढरपूरहून परळी येथे कामाच्या शोधात आलेले एक मागासवर्गीय समाजाचे कुटूंब परळी रेल्वे स्टेशन परिसरात झोपले असता त्या कुटुंबातील एका लहान मुलीला निर्जन ठिकाणी घेऊन जाऊन तिच्यावर केला आहे. पिडीत मुलगी ही स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय, अंबाजोगाई येथे उपचार घेत आहे. परळी रेल्वे स्टेशनवर ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री जे रेल्वे पोलीस ड्युटीवर होते. तसेच परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे जे कर्मचारी ड्युटीवर होते त्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे सदरील घटना घडली आहे. बीड जिल्हामध्ये प्रमुख्याने परळी पोलीस आपल्या कर्तव्यात कसूर करीत आसल्यामुळे परळी शहरामध्ये गुन्हेगार लोकांवर पोलीसांचा म्हणावा तेवढा वचक राहीला नाही. परळी पोलीस अन्यत्र गुंतलेले असल्यामुळे रात्री दिलेल्या ड्यूट्या ते सक्षमपणे बजावत नसल्यामुळे एस.सी.समाजाच्या गरीब कुटुंबावर अशी बिकट वेळ आली आहे. जे पोलीस रात्री ड्यूटीवर असताना चिमुरडीवर अत्याचार झाला त्या गुन्हात पोलीसांना ही सहआरोपी करा तसेच पिडीत कुटूंबाचे पुनर्वसन करून शासकिय सेवेत समाविष्ट करा. अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) च्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर निवेदक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे, जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड, मराठवाडा विभागीय प्रवक्ता धिमंत राष्ट्रपाल, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष बादल तरकसे, गणेश उपाडे, रवि आवाडे, सुरज शिंदे, सोमनाथ कांबळे, अंकुश कांबळे व प्रथमेश शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


# परळीतील चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्या–अक्षय भुंबे

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) ची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.४ सप्टेंबर**


परळीच्या रेल्वे स्थानक परिसरात शनिवारी एस.सी.समाजाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराणे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्या, पिडीत कुटुंबाचे पुनर्वसन करा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे यांच्यासह शिष्टमंडळाने उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना मंगळवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवार, दिनांक ३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक व उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मंगळवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री पंढरपूरहून परळी येथे कामाच्या शोधात आलेले एक मागासवर्गीय समाजाचे कुटूंब परळी रेल्वे स्टेशन परिसरात झोपले असता त्या कुटुंबातील एका लहान मुलीला निर्जन ठिकाणी घेऊन जाऊन तिच्यावर केला आहे. पिडीत मुलगी ही स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रूग्णालय, अंबाजोगाई येथे उपचार घेत आहे. परळी रेल्वे स्टेशनवर ३१ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री जे रेल्वे पोलीस ड्युटीवर होते. तसेच परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे जे कर्मचारी ड्यूटीवर होते त्यांनी कर्तव्यात कसूर केल्यामुळे सदरील घटना घडली आहे. बीड जिल्हामध्ये प्रमुख्याने परळी पोलीस आपल्या कर्तव्यात कसूर करीत आसल्यामुळे परळी शहरामध्ये गुन्हेगार लोकांवर पोलीसांचा म्हणावा तेवढा वचक राहीला नाही. परळी पोलीस अन्यत्र गुंतलेले असल्यामुळे रात्री दिलेल्या ड्यूट्या ते सक्षमपणे बजावत नसल्यामुळे एस.सी.समाजाच्या गरीब कुटुंबावर अशी बिकट वेळ आली आहे. जे पोलीस रात्री ड्यूटीवर असताना चिमुरडीवर अत्याचार झाला त्या गुन्हात पोलीसांना ही सहआरोपी करा तसेच पिडीत कुटूंबाचे पुनर्वसन करून शासकिय सेवेत समाविष्ट करा. अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) च्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर निवेदक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अक्षय भुंबे, जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड, मराठवाडा विभागीय प्रवक्ता धिमंत राष्ट्रपाल, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष बादल तरकसे, गणेश उपाडे, रवि आवाडे, सुरज शिंदे, सोमनाथ कांबळे, अंकुश कांबळे व प्रथमेश शिंदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गणेश विसर्जनासाठी शहरात सहा ठिकाणी कृत्रिम अमृत कलश कुंड

## पोलिस विभागाच्यावतीने कडेकोट पोलिस बंदोबस्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**

गणेश विसर्जनासाठी हिंगोली नगर पालिकेच्यावतीने गणेश विसर्जनासाठी सहा ठिकाणी कृत्रिम अमृतकलश कुंड उभारण्यात येणार आहेत. तसेच गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरासह जिल्ह्यात पोलिस विभागाच्यावतीने चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून श्री विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता शहरात पार्कींगची व्यवस्था तसेच भाविकांना पावसापासून संरक्षण करण्यासाठी वॉटरप्रुफ मंडप टाकण्यात आला आहे. शहरात संवेदनशील व महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे देखील लावण्यात आले आहेत.

नगर पालिकेच्यावतीने मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर तसेच नगर पालिका कर्मचारी परिश्रम घेत असून भाविकांना गणेश विसर्जन त्यांच्याच जवळच्या भागात करता यावे यासाठी सहा ठिकाणी अमृतकलश कुंड उभारण्यात येत आहेत. यामध्ये नवीन नगर परिषद कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ, जुन्या नगर परिषदेच्या इमारतीच्या अग्नीशमन केंद्राजवळ, एनटीसी भागातील महेश उद्यान, आदर्श महाविद्यालय, छत्रपती शिवाजी नगर येथील दत्त मंदिराच्या लगत पालिकेच्या मोकळ्या जागेत तसेच शासकीय रूग्णालयालगत रिसालाबाजार येथे कुंड ठेवले जाणार आहेत.या ठिकाणी निर्माल्य संकलन कलश ठेवले जाणार आहेत. नागरिकांनी या कलशात निर्माल्य टाकावे तसेच अमृत कुंडात गणेशमूर्तीचे विसर्जन कराण्याचे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी केले आहे.

नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनासाठी बाहेर जिल्ह्यासह परराज्यातून मोठ्या संख्येने भाविक अनंत चर्तूदशीच्या दिवशी हिंगोली शहरात दाखल होतात. या पार्श्वभूमीवर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी नुकतीच दर्शन मार्गाची पाहणी केली तसेच भाविकांना पावसाचा त्रास होऊ नये यासाठी मंदिर संस्थान समितीकडून दर्शन मार्गावर वॉटर प्रुफ मंडपाची उभारणी करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी अनेक स्वयंसेवी संस्था, दानशूर व्यक्ती यांनी अन्नदानासह चहा, पाणी तसेच फराळाची व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच अनेक स्वयंसेवक याठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी परिश्रम घेणार आहेत.

हिंगोली शहरासह जिल्हाभरात १५०० ठिकाणी गणेशमूर्ती स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ३२१ गावांमधून एक गाव एक गणपती स्थापना झाल्यामुळे या गावांमधून पोलिसांचा बंदोबस्ताचा ताण हलका झाला आहे मात्र इतर ठिकाणी कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवला जाणार आहे. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांनी बंदोबस्ताचा आढावा घेतला असून जिल्ह्यातील संवेदनशील भागात राज्य राखीव दलाचे जवान तैनात केले जाणार आहेत. याशिवाय दंगा काबू पथक, शीघ्रकृती दलाचे पथक कार्यरत असणार आहे. याशिवाय गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पाच पथके तर शहरात पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन पथके कार्यरत असणार आहेत. संवेदनशील भागात मिरवणुकीचे छायाचित्रीकरण केले जाणार आहे. मिरवणूकीच्या काळात गोंधळ घालणाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे. याशिवाय मोठ्या शहरांमधून सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र पथकेही स्थापन करण्यात आली आहेत.

# आ. मुटकुळेंना वर्षावरील श्रींची आरती करण्याचा मिळाला मान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**

महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष आणि जनतेच्या मनावर राज्य करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अधिकृत निवासस्थानी 'वर्षा' येथे श्री गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. याच पार्श्वभूमिवर काल (दि. ३ सप्टेंबर) रोजी श्री गणपतीच्या महाआरतीचा विशेष कार्यक्रम पार पडला.

या विशेष आरतीचा मान हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांना लाभला. हा क्षण उपस्थित सर्व मान्यवरांसाठी अत्यंत भाविक आणि अभिमानास्पद ठरला. आमदार मुटकुळे यांनी संपूर्ण भक्तिभावाने आरती सादर केली आणि श्री गणरायाचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे वरीष्ठ मंत्री चंद्रकांतदादा पाटील, तसेच इतर राजकीय मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी एकत्र येऊन गणरायाच्या जयघोषात महाआरतीचा लाभ घेतला. यावेळी हिंगोली येथील पदाधिकारी यांची देखील उपस्थिती होती.

शासन, प्रशासन आणि जनतेच्या हितासाठी सतत कार्यरत असणारे आमदार तानाजीराव मुटकुळे यांना मिळालेला हा विशेष सन्मान, त्यांचे कार्य आणि जनतेवरील विश्वासाचे प्रतीक मानला जात आहे. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी श्री गणरायाच्या चरणी महाराष्ट्राचे सर्वसामान्य जनजीवन सुखी आणि समृद्ध होवो अशी प्रार्थना केल्याचे सांगितले. तसेच राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी मला श्री गणपती बाप्पाची आरती करण्याचा मान मिळाला हे माझे भाग्य समजतो.

# नगर परिषद गणेश मंडळाच्यावतीने महाप्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**



हिंगोली नगरपरिषद कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री गणेशोत्सवानिमित्त महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ भाविकांनी मोठ्या संख्येने घेतला.

हिंगोली नगर परिषद कर्मचारी गणेश मंडळाच्यावतीने येथील अण्णाभाऊ साठे वाचनालयात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे, उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, नगर अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, तसेच श्याम माळवटकर, देवीसिंग ठाकूर, विश्वनाथ घुगे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाप्रसाद वितरणाच्या कार्यक्रमात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग घेतला. नगरपरिषद प्रशासनाकडून आलेल्या प्रत्येक नागरिकाला भक्तिभावाने महाप्रसाद वाटप करण्यात आला. हिंगोली नगरपरिषदेकडून दरवर्षी गणेशोत्सव काळात सामाजिक एकोप्याचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यातीलच एक महत्त्वाचा भाग म्हणजे महाप्रसादाचे आयोजन. ही परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून अखंडपणे सुरु असून यंदाही तिचे उत्साहात पालन करण्यात आले. नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे नागरिकांतून विशेष कौतुक होत असून अशा सामाजिक उपक्रमांतून प्रशासन व नागरिक यांच्यातील सुसंवाद वृद्धिंगत होतो असे मत अनेकांनी व्यक्त केले.



**हिंगोली– शहरातील सराफा बाजार येथील उत्तर मुखी हनुमान मंदिराच्या बांधकामाचा शुभारंभ भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, प्रा दुर्गादास साकळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी नगराध्यक्ष सुधीरअप्पा सराफ, माजी शहराध्यक्ष मनोज शर्मा, उमेश गुठ्ठे, महेश शहाणे, शाम खंडेलवाल, बाबा घुगे, घन यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### श्री साई गणेश मंडळाकडून आरोग्य शिबीर



हिंगोली– श्री साई गणेश मंडळ बियाणी नगर यांच्यावतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. साई गणेश मंडळाचे अध्यक्ष कैलास काबरा व समस्त सदस्य यांच्यावतीने दि ४ सप्टेबर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात विविध प्रकारच्या आरोग्याची तपासणी ज्यात हृदयरोग व शस्त्रक्रिया अनियंत्रित मधुमेय, संसर्गजन्य रोग थायरॉईडचे शस्त्रक्रिया आतड्यांचे आजार, शस्त्रक्रिया मेंदूचे गंभीर आजार, रक्ताचे गंभीर आजार, पोटाच्या शस्त्रक्रिया ,मुक्तपिंडाचे शस्त्रक्रिया, हाडांवरील शस्त्रक्रिया, लहान मुलावरील शस्त्रक्रिया, फुफुसावरील शस्त्रक्रिया, साधूपिंडावरील शस्त्रक्रिया अशा विविध प्रकारच्या आजारांच्या रक्त तपासण्या तज्ञ डॉक्टरांच्या वतीने करण्यात आल्या. पुढील उपचाराकरता त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. डॉ.विठ्ठल रोडगे, डॉ. तापडिया, डॉ. मुपकलवार, डॉ. पठाण, डॉ.शुभम वि. रोडगे आदी उपस्थित होते. या आरोग्य शिबिरात सकाळपासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत जवळपास १७५ नागरिकांनी आरोग्याची तपासणी केली.

### विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडा– डोंगरे



हिंगोली– येथील ग्रामीण पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील पोलिस पाटील यांची तसेच मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी पोनि श्यामकुमार डोंगरे यांनी पोलिस पाटील यांच्यासह मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. गणेश विसर्जन मिरवणुक शांततेत पार पाडण्याचे आवाहन केले तसेच विसर्जनावेळी लहान मुलांना खोल पाण्यात जाऊ न देण्याच्या सूचना केल्या. मिरवणुक काळात कोणी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केल्यास ११२ या क्रमांकावर तत्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले. पोलिस पाटील यांनी मिरवणुकीवर काटेकोरपणे लक्ष देऊन मिरवणुका उत्साहात व शांततेत पार पाडण्याच्या सूचना यावेळी पोनि डोंगरे यांनी दिल्या.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, धर्मादाय रूग्णालय मदत कक्षातर्फे आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**



श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान २०२५ अंतर्गत मुख्यमंत्री सहायता निधी तथा धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष सार्वजनिक गणेश मंडळ यांच्या समन्वयाने श्री गणेशा आरोग्याचा अभियान राबवण्यात आले. या आरोग्य शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंजनी रमेश,निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोदवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता चक्रधर मंगल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर आयोजित करण्यात आले. दि ४ सप्टेंबर रोजी शहरातील परभणी हिंगोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परिसरात असलेल्या रुद्र प्रतिष्ठान गणेश मंडळाच्या परिसरात विना मूल्य आरोग्य अभियान राबविण्यात आले. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मुख्यमंत्री सहायता निधी मदत कक्षाचे प्रमुख डॉक्टर नामदेव कोरडे, डॉ.बिल.आर. पुंडगे, डॉ. चव्हाण, डॉ. शुभदा तांबिले, मुस्कान शेख मुस्कान मस्तान कोमल बद्रीनाथ घुगे, डॉ. रणजीत मस्के यांच्यासह गणेश मंडळाचे गौरव झुनझुनवाला, अग्रवाल मोहित अग्रवाल, निलेश धूत, कुणाल मुंदडा अमोल सारडा, विपुल मुंदडा, अमित मानका चेतन कोरडे, केतन कोरडे, अक्षय खंडेलवाल रुपेश खंडेलवाल, विशाल दुधवडकर आदींची उपस्थिती होती यावेळी विनामूल्य आरोग्य अभियानात शेकडो महिला, पुरुषांनी आपल्या आरोग्याची तपासणी केली. यावेळी रूग्णांना मोफत औषधीचे वाटपही करण्यात आले.

# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील आंदोलनाला आ. मुटकुळेंची दिली भेट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**



राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी, कर्मचारी यांचे मागील १६ दिवसांपासून विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाल भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दि ४ सप्टेंबर रोजी भेट देत आंदोलकांना त्यांच्या मागण्यांसंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना एकत्रित ४० हजार रूपये मानधन द्यावे आदी मागण्यांसाठी जिल्ह्यातील सुमारे ५५० आरोग्य कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलनात सहभागी झाले आहेत. या आंदोलनामुळ आरोग्य सेवा विस्कळीत झाली असून समुदाय आरोग्य अधिकारीदेखील या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रांचे कामकाज ठप्प पडले आहे.

दि २८ ऑगस्ट रोजी आरोग्य कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. त्यानंतर बुधवारी थाळीनाद आंदोलन केले होते. तसेच जेलभरोचीही तयारी आंदोलनकांनी केली होती. या आंदोलनाची दखल घेत भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी गुरूवारी आंदोलकांना भेट देत त्यांच्या मागण्या जाणून घेऊन संवाद साधला. यावेळी आंदोलकांनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात माहीती दिली. यावेळी आ. मुटकुळे यांनी लवकरच शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी शंकर तावडे, श्रीपाद गारूडी, पी एस गिरी, प्रसाद कुलकर्णी, विशाल ठोंबरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# विघ्नहर्ता चिंतामणी गणपती दर्शन पार्श्वभूमीवर वाहतुक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**

शहरातील गड्डीपीर गल्ली येथील श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती तसेच गणेशोत्सवाच्या निमित्ताने शहरात दर्शनासाठी तसेच मोदक प्रसाद घेण्यासाठी परजिल्ह्यासह राज्यातून हजारो भाविक येतात या पार्श्वभूमीवर दि ५ सप्टेंबर ते ६ सप्टेंबर रोजी वाहतुक मार्गात बदल करण्यात आला असल्याची माहीती पोलिस विभागाने दिली आहे.

नवसाला पावणार श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह परजिल्ह्यातील तसेच परराज्यातील भाविक अनंत चर्तुदशीच्या दिवशी मोदक प्रसाद घेण्यासाठी किंवा नवस फेडण्यासाठी हजारोंच्या संख्येने हिंगोली शहरात दाखल होतात. या पार्श्वभूमीवर रहदारीस अडथळा निर्माण होण्याची तसेच अपघात होण्याची किंवा कोणताही अनुचीत प्रकार घडल्याचे शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता सदर कालावधीत वाहतुक मार्गात बदल करण्यात आले आहेत. इंदिरा गांधी चौक ते अंबिका टॉकीज रोडवर सर्व वाहने पूर्णपणे बंद, मसाणी पेठ चौक ते महात्मा गांधी चौक सर्व वाहने पूर्णपणे बंद, खुराण पेट्रोलपंप चौक ते अंबिका टॉकीज सर्व वाहने बंद, जुनी गोदावरी हॉटेल कॉर्नर ते महात्मा गांधी चौक सर्व वाहनांना प्रवेश बंद आहे. या कालावधीत जवळा पळशी रोडने येणारे वाहन खुशाल नगर, नवा मोंढा, रेल्वे स्टेशन रोडने ये-जा करतील, कळमनुरी तसेच औंढा नागनाथ कडून येणारे वाहने नांदेड नाका जिल्हा परिषद रोडने ये-जा करतील, वाशिम कडून येणारी वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक जिल्हा परिषद रोडने नांदेड नाका मार्गे ये-जा करतील या पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

# श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ४ सप्टेंबर**



शहरातील गड्डी फिर गल्ली येथील प्रसिद्ध श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरात गुरूवार दि ४ सप्टेंबर रोजी दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. सकाळपासूनच मंदिर परिसरात 'गणपती बाप्पा मोरया', 'मंगलमूर्ती मोरया' च्या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

देशभरात नवसाला पावणारा गणपती म्हणून आळखले जाणारे हे मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान ठरले आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भ आणि महाराष्ट्राच्या विविध भागांतून हजारो भाविक येथे दर्शनासाठी आले होते.

येथील गणपतीला मोदकाचा नैवेद्य विशेष प्रिय असल्याने अनेक भाविक आपल्या पूजेसोबत मोदक घेऊन आले होते. मोदकाच्या प्रसादासाठी हे मंदिर विशेष प्रसिद्ध असून श्रद्धेने अर्पण केलेला नैवेद्य बाप्पाला वाहून भाविकांनी समाधानाने दर्शन घेतले. मंदिर परिसरात करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई आणि सजावट पाहण्यासाठी नागरिक विशेषतः लहान मुले उत्सुकतेने गर्दी करत होती. मंदिरात पूजा, आरती आणि विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# महालक्ष्मी साजसजावट स्पर्धा उत्साहात

## स्लग- दोन हजार स्पर्धकांनी नोंदवला सहभाग

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

करण पाटील जाधव मित्र मंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महालक्ष्मी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जवळपास दोन हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे. संजयनगर, शंकरनगर, निळकंठनगर, छत्रपती कॉलनी, भवानी नगर, सिध्दिविनायक नगर, योगेश्वरी कॉलनी, तुलसी पार्क, सावरकर गल्ली, मिल्लत नगर, झेडपी क्वार्टर, रमाबाई नगर या भागात श्री महालक्ष्मी साजसजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या पाच वर्षापासून करण पाटील जाधव मित्र मंडळाच्यावतीने सजावट स्पर्धे चे आयोजन करण्यात येत आहे. या पाचव्या वर्षी जवळपास दोन हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे.



प्रथम बक्षीस स्मार्ट टीव्ही व सन्मान चिन्ह, द्वितीय बक्षीस गॅस शेगडी व सन्मान चिन्ह, तृतीय बक्षीस कुलर व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ पाच बक्षिसे व पाच कुपन मोहनराव इंगळे यांचे हॉटेल सनराईज सहभागी स्पर्धांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती आयोजक करण पाटील जाधव यांच्या वतीने देण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ॲड. अश्विनी धन्नावत, ॲड. पिंकी लड्डा, ॲड. आहुती विजय सेनानी यांनी काम पाहिले. यावेळी स्पर्धकांनी विविध देखावे, पर्यावरण झाडे लावा झाडे जगवा, मराठा आरक्षण देखावे सादरीकरण केले. यावेळी बंडू काळे, विठ्ठल देवकाते, राहुल गुंजकर, रोहित जाधव, स्वप्निल मोताळे, प्रतीक चिखले, गजानन लुटे व धीरज चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

# नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांचे गणरायाचे दर्शन व सत्कार

### सामाजिक कार्यासाठी प्रेरणा

नाना पाटेकर यांचे कार्य आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरजूंसाठी चालवलेले उपक्रम हे राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत, असे मत या प्रसंगी उपस्थित सर्वांनी व्यक्त केले.गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेली ही सदिच्छा भेट केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक आणि समविचारी कार्याच्या दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण ठरली. यामुळे शासकीय, सामाजिक संस्थांमधील समन्वय वाढवण्यास हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

मुंबई सुप्रसिद्ध सिने अभिनेते, पद्मश्री पुरस्कार सन्मानित व नाम फाउंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर यांच्या सिंहगड, पुणे येथील निवासस्थानी शिवसेनेचे जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी सदिच्छा भेट देत गणपती बाप्पाचे दर्शन घेतले, तसेच नाना पाटेकर यांचा मनोभावे सत्कार केला. या प्रसंगी नाम फाउंडेशनचे मराठवाडा समन्वयक राजाभाऊ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव बोडके, उपजिल्हाप्रमुख प्रवीण पाटील फुके, तसेच कैलासराव जगताप यांची उपस्थिती होती. गणेशोत्सवानिमित्त स्नेहभेट व सामाजिक संवाद या भेटीदरम्यान गणरायाचे दर्शन घेत, सामाजिक प्रश्नांवर व नाम फाउंडेशनच्या कार्यपद्धतीवर सकारात्मक चर्चा झाली. ग्रामीण भागातील पाणीटंचाई, शेतीविषयक अडचणी, आणि शेतकऱ्यांसाठी फाउंडेशन करत असलेल्या कार्याबाबत अनुभव व विचारांची देवाण – घेवाण झाली. भाऊसाहेब घुगे यांनी नाना पाटेकर यांच्याशी संवाद साधताना मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या, शेतीसाठी जलसंधारण आणि रोजगाराच्या संधी यावर प्रकाश टाकला आणि या संदर्भातील कामांना पुढील पाठबळ देण्याची भूमिका मांडली. सत्कार आणि सदिच्छा भेट या विशेष प्रसंगी भाऊसाहेब घुगे यांनी नाना पाटेकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. नाना पाटेकर यांनीही त्यांच्या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले आणि सामाजिक कामासाठी सातत्याने पुढे राहण्याचा संदेश दिला.

## संक्षिप्त

### राजर्षी शाहू विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा
पारध / प्रतिनिधी

येथील भिलदरी बहुउद्देशिय संस्थेच्या राजर्षी शाहू विद्यालयात सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक पद रोहित गणेश तेलंग्रे या विद्यार्थ्यांने भूषवले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भिलदरी बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. सुखदेव मांटे हे होते. शिक्षकांचे महत्त्व आणि त्यांनी देशाच्या जडणघडणीत बजावलेल्या भूमिकेबद्दल विद्यार्थ्यांना त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले .या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे, मुख्याध्यापक विलास लोखंडे, उपप्राचार्य अमोल बांडगे, विद्यार्थ्यांमध्ये अध्यापन कौशल्य निर्माण व्हावे या हेतूने स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका बजावली. या कार्यक्रमात विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मुख्याध्यापक विलास लोखंडे, ज्ञानेश्वर आल्हाट, विवेक प–हाड, सौ. सोनाली भोरकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति आपल्या भावना व्यक्त केल्या. या प्रसंगी स्वप्निल वाघ, भागवत पानपाटील, गजानन लोखंडे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल लक्कस, सूत्रसंचालन कु. मानसी भारती यांनी केले तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापक विवेक अवसरमोल यांनी केले.

### आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलाद च्या अनुषंगाने केलेल्या प्रतिबंधक कारवाई

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

दि. २७.०८.२०२५ रोजी पासुन गणेशोत्सव हा हिंदु बांधवांचा सण मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०५.०९.२०२५ रोजी ईद– ए–मिलाद हा मुस्लीम बांधवांचा एक महत्वाचा धार्मिक सण साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, जालना यांनी दिलेल्या सुचना व आदेशा प्रमाणे विशेष कार्यकारी दंडाधिकारी आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना यांनी जालना जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार ज्यामध्ये हिंदु–मुस्लीम दंगली, हातभट्टी व देशी–विदेशी दारु विक्री करणारे रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार, दरोडे, जबरी चोरी असे गंभीर गुन्हे करणारे रेकॉर्ड वरील जालना जिल्हयातील एकुण ४७२ आरोपीतांविरुध्द कलम १६३ (३) बीएनएसएस प्रमाणे दिनांक ०५.०९.२०२५ ते दिनांक ०७.०९.२०२५ पावेतो ईद–ए–मिलाद व गणेशोत्सव दरम्यान हद्दपारीची कारवाई करण्यात आलेली आहे. ज्यात पोस्टे सदर बाजार ६३, कदीम जालना २१, तालुका जालना २१, चंदनझिरा ६६, बदनापुर १८, परतुर २४, मंठा ४०, आष्टी ०७, सेवली १६, मौजपुरी १३, भोकरदन ८५, जाफ्राबाद १७, पारध ३२, हसनाबाद ११, टेंभुर्णी ०५, अंबड १४, घनसावंगी १०, गोंदी ०३ आणि तिर्थपुरी ०६ अशाप्रकारे पोस्टे निहाय कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच आगामी गणेशोत्सव व ईद ए मिलादचा सण शांततेत, प्रेमभावनेत व सामुहिक सौदार्हत साजरा करावा असे आवाहन सर्व जनतेला जालना पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे.

### गोंदी पोलीसांकडून वाळु माफीयांवर कार्यवाही ०६,०७,५०० रू.चा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

सपोनी ए. एस. खांडेकर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की दोदडगाव शिवारात काहीही सब हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या वाळू साठवण, उत्खनन व वहन करत आहे. घटनेची माहिती मिळताच तात्काळ पोलीस उपनिरीक्षक श्री. हावले, पोकॉ/९७७ हवाळे, पोकॉ/१८१ भवरे हे रवाना होऊन बातमीची खात्री करतात त्या ठिकाणी तीन इसम अवैधरित्या वाळूची साठवण करून त्याची चोरी च्या उद्देशाने वाहतूक करीत असतांना एक लाल रंगाच्या महिंद्रा ५७५ DI SP Plus कंपणीचा ट्रॅक्टर चा चालक नामे शाम परमेश्वर जगताप रा.धाकलगाव ता. अंबड जि. जालना हा विनापरवाणा ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये त्याचे सोबतचे दोन साथीदारांचे मार्फतीने दिड ब्रास वाळु अंदाजे ०७,५०० रू. चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आला. त्यावरून पोलीस ठाणे गोंदी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्यात एकुण ०६,०७,५०० रू.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आलेला आहे. व गुन्ह्यातील तीन्ही आरोपींना अटक करण्यात आलेली असून आरोपी त्यांना माननीय न्यायालयासमोर हजर केले असता त्यांनी पोलीस कोठडी सुनावलेली आहे. सदरची कामगीरी हि पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक किरण हावले, पोकॉ/९७७ प्रदिप हवाळे, पोकॉ/१८१ गजानन भवरे सर्व पोलीस ठाणे गोंदी यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा पुढिल तपास पोलीस उप निरीक्षक किरण हावले हे करीत आहेत. वाळु चोरीसारख्या अवैध धंद्याविरूध्द पोलीस विभागाची ही कारवाई असुन. अशी मोहीम सातत्याने राबविण्यात येईल. नागरिकांनी आपल्या परिसरात अशा प्रकारची माहिती मिळताच तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे

# आदिवासीसमाजातीलनागरिकांनामुख्यप्रवाहातआणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत – जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदि कर्मयोगी अभियान योजनेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील २४ गावातील आदिवासी समाजाच्या नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आयोजित प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान बैठकी दरम्यान त्या बोलत होत्या. यावेळी बैठकीस जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम., जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर, उप मुख्य कार्यकारी पंचायत उदयसिंग राजपूत, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन आर. डी. तुबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता एल. बी. बारगिरे, प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी संबंधित विभागातील अधिकारी यांना सदर योजनेंतर्गत पुढील प्रमाणे सामुहिक विकासाच्या योजना राबविणे अपेक्षीत असल्याचे सांगितले. यामध्ये आवास योजना, जल अपुर्ती साधने विहिरी, हॅन्डपंप, ट्युबवेल, पाण्याच्या टाक्या, जलाशये, नहरे इत्यादी, आरोग्य व पोषण, शिक्षण, रस्ते व दळणवळण, वीजेची जोडणी, सामुदायीक व धार्मिक सुविधा मध्ये मंदीर, मस्जिद, चर्च किंवा अन्य धार्मिक स्थळे विकास, दूरसंचार साधनामध्ये टपालघर, टेलीफोन बुथ, मोबाईल टॉवर, रेडीयो सूचना बोर्ड, बाजारपेठ व व्यापार साधने, स्वच्छतागृहे, सामुदायीक शौचालये, मलनिस्सारण योजना, कृषि सहायता मध्ये पशुशाला, अन्न गोदाम, सिंचन पंपाचे दुरुस्ती, मनोरंजन यामध्ये खेळ



मैदान, सांस्कृतिक सण साजरे करण्याचे ठिकाण, मोकळे मैदानाचा विकास सेवा साधने यांचा लाभ संबंधित लाभार्थींना उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगितले. तसेच तालुका मास्टर ट्रेनरची नियुक्ती करून जिल्हा प्रोसेस लॅब गठीत करणे, अनुसूचित जमाती मधील विद्यार्थांसाठी वसतीगृह उभारणीचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना सादर करणेबाबत निर्दे श दिले, दूरसंचार विभागाने संबंधित गावामध्ये दूरसंचार जोडणीबाबत तातडीने सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करावा. सदरील कार्यक्रमाशी संबंधित सर्व सहभागी यंत्रणांनी एकत्रितपणे गावनिहाय शिबीरांचे आयोजन करुन, लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळवून द्यावा. आदिवासी समाजातील कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष मोहीम राबविणेबाबतच्या सूचना ही श्रीमती मित्तल यांनी यावेळी दिल्या. यावेळी तहसीलदार परतुर श्रीमती प्रतिभा गोरे, जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगिता भागवत, गटविकास अधिकारी परतुर एन. टी. खिल्लारे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी आय. सी. डी. एस. श्रीमती कोमल कोरे, गटविकास अधिकारी भोकरदन महेंद्र साळवे, गटविकास अधिकारी अंबड श्रीमती ज्योती लबडदेवी, गटविकास अधिकारी बदनापूर श्रीमती ज्योती राठोड, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. पी. डी. चौधरी, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. बी. बनसावडे, उप कार्यकारी अभियंता डी. पी. घोरपडे, सहा आयुक्त पंचायत डॉ. सु. दी. माने, मेढाचे व्यवस्थापक एन. जी. जगताप, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. भरत वानखेडे, भागवत कदम, श्रीमती माने मॅडम, सोमनाथ थोरवे, भारत चव्हाण, श्रीमती अनुपमा मस्के, बिराप्पा पाटील, श्री बोराडे यांच्यासह अन्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जवाहर नवोदय विद्यालय व्यवस्थापन व सल्लागार समिती बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय, जालना यांच्या विद्यालय सल्लागार समिती तसेच विद्यालय व्यवस्थापन समिती यांची महत्वाची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस खासदार संजय जाधव यांचे प्रतिनिधी मधुकर पाईकराव, शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पाटील, तसेच विद्यालयाचे प्राचार्य एस. जी. पवार, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय परतूर यांच्या मुख्याध्यापिका



श्रीमती साळवे, पीटीसी सदस्य विनोद दाभाडे, रेणुका पळसकर तसेच इतर समिती सदस्यांची उपस्थिती होती. दोन्ही बैठकीत शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, तसेच विद्यालयातील पायाभूत सुविधा बळकटीकरण, स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि गुणवत्तापूर्ण भोजन यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश दिले. त्यांनी नीट आणि जेईई सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना अधिक चांगली तयारी करून देण्यासाठी नवोदय 'लक्ष पोर्टल'चा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन केले. तसेच मुलांच्या सुरक्षिततेसाठी वसतिगृहाची नियमित देखभाल आणि दुरुसती करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. दोन्ही बैठकीदरम्यान मागील कार्यकाळातील कामगिरीचा आढावा घेण्यात आला आणि आगामी शैक्षणिक वर्षासाठी ठोस उपाययोजना आखण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच त्यांची सुरक्षितता, स्वच्छता आणि आरोग्य यावर विशेष भर देण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या.

# विज बिल शून्य करण्यासाठी हर घर सोलार योजनेचा लाभ घ्या; केंद्र व राज्य सरकारच्या सबसिडीसह ३०० युनिट पर्यंत मोफत वीज मिळवा - आ. लोणीकर यांचे जनतेला आवाहन

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

हर घर सोलर योजना ही केंद्र सरकारची पंतप्रधान सूर्य घर: मुफ्त बिजली योजना आहे, ज्याचा मुख्य उद्देश घरांच्या छतावर सौर पॅनेल बसवून मोफत वीज प्रदान करणे हा आहे. या योजनेअंतर्गत, पात्र कुटुंबांना प्रति महिना ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळते आणि छतावरील सौर पॅनेल बसवण्यासाठी सरकारकडून सबसिडी देखील दिली जाते.

* केंद्र व राज्य सरकारकडून हर घर सोलार योजनेसाठी सबसिडी – १ किलोवॅट सौर पॅनल साठी ३० हजार केंद्र सरकार व १५ हजार राज्य सरकार अशी ४५ हजार रुपये सबसिडी दिली जाते. २ किलो वॅट सौर पॅनल साठी केंद्र सरकारकडून ६० हजार तर राज्य सरकारकडून ३० हजार रुपये अशी एकूण ९० हजार रुपये सबसिडी दिली जाते. तर ३ किलो वॅट सौर पॅनल साठी ७८ हजार रुपये सबसिडी देण्यात येते. पात्र कुटुंबांना दरमहा ३०० युनिट मोफत वीज मिळते, ज्यामुळे विजेचे बिल कमी होते. सौर पॅनेल बसवण्यासाठी केंद्र सरकारकडून सबसिडी दिली जाते. या योजनेचा उद्देश घरांचे वीज बिल कमी करणे किंवा ते शून्य करणे हा आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले.

* हर घर सोलार योजनेचा अर्ज ऑनलाईन करण्या संदर्भात लोणीकरांचे आवाहन – या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाला www.mahadiscom.in या वेबसाईटवर जाऊन आपला अर्ज ऑनलाइन करणे आवश्यक आहे. घरावर सौर पॅनल बसवण्यात आल्यानंतर पहिले बिल येईल व त्यानंतर दीड महिन्याच्या आत संबंधित



ग्राहकाला त्याला मिळणारी सबसिडी त्याच्या खात्यात जमा होईल त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी हर घर सोलार योजनेअंतर्गत अर्ज करावेत व आपले वीज बिल शून्य करावे.

* बळीराजा योजनेअंतर्गत २३४५ ग्राहकांना २८ कोटी ९३ लाख रुपयांची सबसिडी – बळीराजा योजनेअंतर्गत मंठा तालुक्यातील ११७४५ तर परतुर तालुक्यातील ११७०० अशा एकूण २३४४५ ग्राहकांना २८ कोटी ९३ लक्ष रुपयांची सबसिडी एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत प्राप्त झाली असल्याची माहिती देखील यावेळी दिली. सुधारित वितरण क्षेत्र प्रणाली योजना ठउड्ड अंतर्गत विद्युत वाहिनी विलगीकरण करण्यात येणाऱ्या ५७ वाहिन्या असून उच्च दाब वाहिनी ६४२ किलोमीटर तर लघुदाब वाहिनी २९४ किलोमीटर आहे. त्यापैकी मंठा तालुक्यात ११३ किलोमीटर तर परतुर तालुक्यात ३५ किलोमीटर उच्च दाब वाहिनी लाईन टाकण्यात आली आहे. तर लघुदाब वाहिनी लाईन परतुर तालुक्यात १७ किमी तर मंठा तालुक्यात ७५ किलोमीटर टाकण्यात आली आहे.

* मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत १४ ठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प सुरू; तर ११ ठिकाणी तांत्रिक अडचणी दूर करून लवकरच सुरू होणार सौर ऊर्जा प्रकल्प – परतूर विधानसभा मतदारसंघातील सर्व ३३/११ केव्ही उपकेंद्राच्या ठिकाणी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना (MSKVY) अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे करण्यात येणार आहे त्यापैकी परतुर तालुक्यातील खांडवी ५MV, मंठा तालुक्यातील विडोळी येथे ५MV व पांगरी गोसावी येथे २MV तर जालना तालुक्यातील नेर येथे ६MVसौर क्षमतेचे काम पूर्ण झाले आहे. त्याचबरोबर परतुर तालुक्यातील परतुर येथे ७MV, श्रीष्टी १MV, सातोना २MV, लोणी ३MV व आष्टी येथे ३ MV, मंठा तालुक्यातील मंठा ३MV,तळणी ५MV, जयपुर ५MV आणि जालना तालुक्यातील सेवली १MV व डांबरी ५MV क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणी करण्याचे काम करण्यात येणार आहे. तसेच मंठा तालुक्यातील दहिफळ खंदारे देवगाव खवणे केंधळी पांगरी बुद्रुक परतुर तालुक्यातील वाटुर कोकाटे हदगाव वरफळ सोयांजना आंबा कराळा वाढोणा येथे लवकरच शासकीय किंवा खाजगी जमीन उपलब्ध करून सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी केली जाणार आहे.

* कुसुम योजनेअंतर्गत १३११ तर मागेल त्याला सौर पंप या योजनेअंतर्गत १५२६ शेतकऱ्यांना सौर कृषी पंप – परतूर मतदारसंघातील माहे ऑगस्ट २०२५ अखेर पंतप्रधान कुसुम योजनेअंतर्गत परतुर तालुक्यात ११७६ तर मंठा तालुक्यात ३९८ असे एकूण १५७४ अर्ज मंजूर करण्यात आले असून त्यापैकी परतुर तालुक्यातील ९८१ आणि मंठा तालुक्यातील ३३० अशा एकूण १३११ शेतकऱ्यांच्या शेतात शेतीपंप बसवण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेअंतर्गत मंठा तालुक्यातील २२९१ तर परतुर तालुक्यातील ४४१३ अशा एकूण ६४०४ शेतकऱ्यांनी अर्ज केले होते त्यापैकी परतुर तालुक्यातील १३०७ आणि मंठा तालुक्यातील २२९ अशा एकूण १५२६ गरजू शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बसविण्यात आले आहेत.

* पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत ३०४ लाभार्थ्यांना सौर पॅनल जोडणी – पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत मंठा तालुक्यातून ३१६ तर परतूर तालुक्यातून ५४६ असे एकूण ८६२ नागरिकांनी अर्ज दाखल केले होते त्यापैकी मंठा तालुक्यातील १३४ परतूर तालुक्यातील १७० असे एकूण ३०४ लाभार्थी जोडणीसाठी तयार आहेत तर मंठा तालुक्यातील ७८ आणि परतुर तालुक्यातील २०३ अशा एकूण २८१ लाभार्थ्यांना वीज जोडणी पूर्ण करण्यात आली.

* ५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सात गावांमध्ये सौर ग्राम योजना – सौर ग्राम योजनेअंतर्गत परतुर विधानसभा मतदारसंघातील आष्टी सातोना वाटुर मंठा तळणी नेर सेवली या गावांचा समावेश करण्यात आला असून ५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत सर्व शासकीय कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय प्राथमिक आरोग्य केंद्र पशुवद्यकीय दवाखाने अंगणवाडी शाळा यासह सर्व शासकीय इमारतींवर सौर पॅनल बसवले जाणार असून यासंदर्भात आवश्यक असणारा सर्वे पूर्ण झालेला आहे. लवकरच या सर्व शासकीय इमारतींवर सौर पॅनल बसवले जातील असेही लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# वनविभागाच्या हदीत बोयोमेडिकल वेस्टचा विळखा



**तभा वृतसेवा**
**निवघा, दि. ४ सप्टेबर-**

निवघा बा येथे वनविभागाच्या हलगर्जीपणा मुळे तीन वन्य प्राण्यांचा मृत्यू झाल्याचे (निल गाय) निदर्शनास आले आहे. एक महिन्या पुर्वी निवघा बीट चे वनपाल झपलवार साहेब आणि वनमजूर बालाजी डोंबे यांना बायो मेडिकल वेस्टचा वनविभागाच्या हदीत मोठ्या प्रमाणात येथील स्थानिक दवाखान्यातील कचरा टाकण्याचा सपाटा सुरूच आहे

मात्र जाणिवपूर्वक कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात तत्परता दाखविली जात नसुन.या बायो मेडिकल वेस्टच्या कचर्या मुळे तेथुन जवळच तलाव आहे त्या तलावात सदरील इंजेक्शन,मुदत संपलीली जेनेटिक्स औषधी च्या बाटल्या, रक्त रंजित रूई, गोळ्या, आणि जमीनीत विसर्जित न होणार्या अशा अनेक वेस्ट वस्तू मोठ्या प्रमाणात वनविभागाच्या हदीत आणुन फेकण्यात आले आहे.या अशा परिस्थितीत वन्य प्राणी,पाळीव प्राणी, आणि तलावात मासे अनेक जीव मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होऊ शकतात तसेच पावसाळ्याच्या वाहुन जाणार्या पाण्यामुळे जमिनी मध्ये विसर्जित होऊन मानवाच्या आरोग्यावर चांगलाच दुष्परिणाम होऊ शकतात या प्रकारांकडे वनविभागाने तत्परतेने कारवाई करण्यात येणार का अशी निवघा परिसरात चर्चे ला जोर धरीत आहे

अशाप्रकारे बायो मेडिकल वेस्टच्या कचरा टाकण्यारे संबंधित दवाखान्या वर वनविभागा ताकाळ कारवाई करतील का? या कडे निवघा परिसरातील नागरिक अपेक्षा धरून आहे.

# आ. भिमराव केराम यांच्या सुचनेनुसार पैनगंगा नदीवरिल कठडे दुरुस्ती कामास प्रारंभ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ सप्टेबर-**

मागील आठवड्यात पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे किनवट शहरालगतच्या पैनगंगा नदीवरील पूल धोक्यात आला होता. या पूलावरील लोखंडी संरक्षक कठडे वाहून गेल्याने गणेशोत्सव काळात भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर आमदार भिमराव केराम यांनी तात्काळ पुढाकार घेत नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांना कठडे दुरुस्तीसाठी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

मुख्याधिकारी डॉ. कुरवाडे यांनी विदर्भ विभागातील सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार करून कठडे बसवणे व दुरुस्ती करण्यासाठी



आवश्यक पाठपुरावा केला. त्यानंतर महागाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता एस. एस. पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक ४ सप्टेंबरपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

या कामामध्ये नगरपरिषद कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, अझहर अली तसेच संबंधित कर्मचारी सक्रीय सहभाग घेत आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अनंत चतुर्दशीपूर्वी संपूर्ण काम पूर्ण होईल, ज्यामुळे भाविकांना सुरक्षितपणे व विनाअडथळा वाहतूक करता येईल. यामुळे गणेशोत्सव काळात शहरातील नागरिक व भाविकांची सुरक्षा अबाधित राहील. नगरपरिषदेने तातडीने केलेल्या या कार्यवाहीबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, प्रशासनाच्या कार्यशैलीचे कौतुक होत आहे.

# नांदेड महानगर मराठी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ सप्टेबर-**

मुंबई मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशावरून नांदेड महानगर मराठी पत्रकार संघाची सन २०२५- २६ ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

मुंबई मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशावरून सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे यांनी बुधवार दि.३ सप्टेंबर रोजी

नांदेड महानगर मराठी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर केली असून महानगराध्यक्षपदी रविंद्र संगनवार तर कार्याध्यक्षपदी गजानन कानडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे. उपाध्यक्ष - किरण कुलकर्णी, उपाध्यक्ष -प्रशांत गवळे, उपाध्यक्ष - आनंद कुलकर्णी, उपाध्यक्ष - सुरेश काशिदे, महानगर सरचिटणीस - सुनिल पारडे, कोषाध्यक्ष - मारुती सवंडकर, संघटक - प्रल्हाद लोहेकर, समन्वयक - स.रविंद्रसिंघ मोदी,महानगर सहसचिव -

कंथक सूर्यतळ, सहसचिव -

मिर्झा आझम बेग मेहमूद बेग, प्रसिध्दी प्रमुख - माधव गोधणे, प्रसिद्धी प्रमुख - नरेश तुप्तेवार अशी निवड करण्यात आली आहे . दरम्यान, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, माजी कोषाध्यक्ष तथा पत्रकार अधिस्वीकृती समितीचे विभागीय अध्यक्ष विजय जोशी, माजी सरचिटणीस चारुदत्त चौधरी आदींनी अभिनंदन केले आहे.

# भोकर येथील गावतलावचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ४ सप्टेबर-**

येथील प्रसिध्द असलेले महादेव मंदिरासमोरील जुन्या गावतलावाचे पूर्नरुज्जीवन व सूशोभीकरणाचे काम शारदा कन्स्ट्रक्शने हाती घेतले असून सदरील सूशोभीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट पध्दतीने होत आहे. गावतलावाची खोलीकरण व साईड पिंचींग साठी लागणारे दगड इतर साहित्य अल्पप्रमाणात लावल्या जात असून तलावात कित्येक वर्षा पासून साचलेली गाळ पुर्णपणे काढण्यात आलेले नसल्याने खोलीकरणाचे काम पाहिजे तसे करण्यात आले नाही जुलै, ऑगस्ट मध्ये



मुसळधार पाऊस पडल्यामुळे खोली कमी असलेला तलाव तुडूंब भरल्या सारखख दिसत आहे.सदरील गाव तलावाचे सूशोभीकरण करण्याऐवजी लवकरच विद्रूपीकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही थातूर मातूर काम करुन शासनाच्या निधीचा संबधीत अधिकारी व गूत्तेदार संगनमताने बोगस काम करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब करीत कामाची विल्हेवाट लावत आहेत तलावाच्या कामाकडे संबधित विभागाचे अधिकारी जाणीवपूर्वक दूर्लक्ष करीत आहेत करोडो रुपयांचे काम असलेल्या गावतलावाचे काम निकृष्ट पध्दतीने केले जात आहे या कामाविषयी अनेकांच्या तक्रारी असून संबधित ठेकेदारांनी घाईगडबडीत काम उरकत असल्याचे निदर्शनास येत आहे गावतलावाचे पूर्नरुज्जिवन व सूशोभीकरणाचे काम शासनाच्या ईस्टिमेट नूसार केले जात नाही थातूर मातूर काम करण्यात येत असल्यामुळे या निकृष्ट कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी गूत्तेदारावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी सूज्ञ नागरीकातून होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### हाणेगाव येथे गणेश विसर्जन निमित्त पोलिस चौकीत शांतता समीतीची बैठक

**हाणेगाव**-हाणेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात गणेश उत्सव साजरा करण्यात येत आहे गावात जागोजागी बाल गणेश मोठे गणेश बसवण्यात आले असुन मोठ्या आस्थेने सर्व धर्मीक लोक रोजच मनोभावेने पुजा, आरती, अन्नदान करुन आपली श्रद्धा प्रकट करत आहेत . गणेश उत्सव हा संपुर्ण भारत देशात साजरा केला जातो याच्यातुन एकात्मता शांतता समता बंधुता धार्मीकतेचा संदेश मिळत असुन गणेश विसर्जन उत्सव जवळच असल्यामुळे याच अनुशंगाने मरखेल पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस ठाणे प्रमुख रविंद्र हुंडेकर यांनी गावातील सर्व छोटे मोठे गणेश मंडळाचे पदाधिकारी आणि स्थानिक सामाजीक राजकीय क्षेत्रातील लोकांना पोलीस चौकीत बोलावुन शासनाने गणेश विसर्जनानिमीत्त दिलेल्या नियमांचा पाढा वाचुन गणेश विसर्जन उत्सव कसा साजरा करायचे याचं सखोल असे मार्गदर्शन केले.यावेळी गावातील प्रतिष्ठीत तंटामुक्ती अध्यक्ष योगेश देशमुख, हज्जुसेठ चमकुडे, विवेक पडकंठवार, दिलीप बंदखडके, बिट जमादार दत्तात्रेय पाटील, यादव सुर्यवंशी, अंगद कुडले,प्रशांत रामपुरे,किशोर आडेकर , बालाजी गीरेवाड,शफीयोदीन कोटग्याळे,माधव नामेवार,शिवा पंचगल्ले,अभिषेक उप्पे,पोलीस कर्मचारी नारायन यंगाले आदीजन उपस्थित होते.

### ज्येष्ठ विहिंप नेते रामलु निलावार यांचे निधन

**किनवट**-शहरात व परिसरात विश्व हिंदू परिषद तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पाळेमुळे घट्ट करण्यासाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेले ज्येष्ठ नेते रामलु निलावार (वय ८४) यांचे हैद्राबाद येथे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने किनवटसह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. निलावार यांनी संघ व विहिंपच्या विचारधारेवर ठाम राहून कोणतीही तडजोड न करता कार्य केले. जुन्या जाणत्या जनसंघाच्या नेत्यांच्या पंक्तीत त्यांचा समावेश होत असे. त्यांनी अनेक कार्यकर्ते घडवले व विचारांचे रोपण समाजात बळकट केले. भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी त्यांचा कायम स्नेह व सखोल संवाद होता. किनवटमध्ये भाजप व विहिंपच्या कार्यकर्त्यांचे ते कायम मार्गदर्शक राहिले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी तसेच नातवंडे असा आप्त परिवार आहे. निलावार यांच्या पार्थिवावर दिनांक ०५ सप्टेंबर रोजी किनवट येथील हिंदू स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल आ. भिमराव केराम, भाजप नेते सुधाकर भोयर, विहिंपचे अनिरुद्ध केंद्रे, जनजाती कल्याण आश्रमचे गोवर्धन मुंडे, ज्येष्ठ संघचालक शंकरराव अमिलकंठवार, विहिंप नेते विठ्ठलराव मच्छर्लावार तसेच गोरक्षा विभागाचे किरण बिच्चेवार, ज्येष्ठ नेते राघु मामा, मुकुंद नारायणराव नेम्मानिवार आदींनी शोक व्यक्त केला आहे.निलावार यांच्या जाण्याने किनवटमधील संघ व विहिंप कार्यकर्त्यांनी एक खंबीर आधारस्तंभ गमावला असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### गोल्ला -गोलेवार यादव महासंघतर्फे रक्तदान शिबीर


**हिमायतनगर-** गोल्ला -गोलेवार यादव महासंघाच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन लकडोबा चौक हिमायतनगर येथे करण्यात आले होते.रक्तदान शिबिराचे प्रमुख अतिथी म्हणून गोल्ला-गोलेवार यादव महासंघाचे प्रदेशाध्यक्ष भुमन्ना आक्केमवाड, नांदेड जिल्हा परीषद कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष अशोकजी कासराळीकर होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाकाध्यक्ष सुभाषराव शिल्लेवाड, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा तालुकाध्यक्ष बाबाराव जरगेवाड होते, तर कार्यक्रमाचे मार्गदर्शक तथा शहराध्यक्ष म्हणून श्यामजी जक्कलवाड हे होते. रक्तदान शिबिरा मध्ये ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक म्हणून युवक अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश अभिषेक बकेवाड यांनी महत्वाची कामगिरी निभावली. यावेळी हिमायतनगर पोलीस निरीक्षक भगत , हिमायतनगर वैद्यकीय अधिकारी वानखेडे, जेष्ठ समाजसेवक प्रकाश करेवाड, मार्गदर्शक बालाजी शैनेवाड, रमेश रामपुलवार,दसरथ गोसलवाड, राजेश्वर चिकनेपवाड, विठ्ठल देशमवाड, दत्ता काईतवाड, निरंजन मॉकलवाड,साई अण्णा कट्टावाड,नारायण कोरेवाड, संटी कपलवाड,प्रकाश भदेवाड,बाबु करेवाड,प्रकाश सोकलवाड,मधुकर मिरगुलवाड, गणेश घोसलवाड बालाजी मॅकलवाड,के.बी.शैनेवाड, साईनाथ निम्मेवाड,गंगाधर बासेवाड, सुरेश शैनेवाड,दत्ता बलपेलवाड, संजय बलपेलवाड, मारोती बकेवाड,एकनाथ काईतवाड,गजानन रेनलेवाड,दत्ता बकेवाड,संजय यटमवाड, ज्ञानदीप तुंगेवाड,लिंगा गोपुवाड,राजु काईतवाड, विशाल तुंगेवाड, बालाजी बकेवाड,योगीराज कारलेवाड,ईतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण शैनेवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवाजी बोट्टेवाड सरंपच यांनी केले.

# रामतिर्थ ठाणे अंतर्गत गणेश सर्व गणेश मंडळांनी डीजे मुक्त; गणेशोत्सवाची नवी दिशा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ४ सप्टेबर-**

गेल्या अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेला दुजोरा देत, यंदाच्या गणेशोत्सवात रामतिर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गणेश मंडळांनी एक महत्त्व पूर्ण आणि समाजोपयोगी निर्णय घेतला. डीजे मुक्त, पर्यावरणपूरक आणि परंपरागत वाद्यांच्या माध्यमातून सण साजरा करत त्यांनी सामाजिक ऐक्याचा, पर्यावरण रक्षणाचा आणि संस्कृतीच्या जतनाचा अद्वितीय संदेश दिला आहे.

नांदेड जिल्ह्यातील रामतिर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील २०गणेश मंडळांनी डीजेचा वापर न करता, भजनी मंडळे, ढोल-ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या सहाय्याने उत्सव साजरा करण्याचा आदर्श पायंडा पाडला. पोलीस अधीक्षक मा. आबिनाश कुमार यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली या मंडळांनी डीजे मुक्त उत्सवाचे लेखी वचन दिले आणि नंतर पोलीस अधीक्षक कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.



विशेषतः, केरूर गावातील नवयुवक गणेश मंडळाचे अध्यक्ष शादुल शेख (मुस्लीम समाज) यांनी उत्सवाचे नेतृत्व करत सामाजिक ऐक्याचे उदाहरण घालून दिले. त्याचप्रमाणे, सुगाव येथील यशवंत गणेश मंडळाने मूर्ती निर्मितीसाठी लागणारी माती हबीब शेख यांच्याकडून सन्मानपूर्वक स्वीकारली, हे सामाजिक सलोख्याचे अनोखे उदाहरण ठरले.

ही केवळ शांततेची नव्हे, तर एकत्रतेची मिरवणूक आहे, असे प्रतिपादन करत पोलीस अधीक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

या प्रेरणादायी उपक्रमात रामतिर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि विक्रम हराळे यांचे योगदानही उल्लेखनीय ठरले. त्यांच्या समन्वयातून आणि मार्गदर्शनातून हा संपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

हा उपक्रम केवळ नांदेड जिल्ह्यासाठीच नव्हे, तर राज्यासाठी सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन आणि परंपरेच्या जोपासनेचा आदर्श ठरत आहे. अशाच सकारात्मक पुढाकारांमधून समाज घडतो आणि सण साजरे करण्याची खरी भारतीय संस्कृती जपली जाते.

# अवैध वाहतुकीमुळे भाविकांचे जीव धोक्यात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ सप्टेबर-**

शहरातून अनेक बेकायदेशीर वाहनाद्वारे बिदर हिंगोली अवैध प्रवासी वाहतूक होत आहे.मुदत संपलेल्या, नादुरुस्त व जीर्ण वाहनाद्वारे अनेक चालक मध्य धुंद अथवा इतर मादक पदार्थांचे सेवन करून बेदरकारपणे वाहन चालवतात. त्यामुळे अवैध प्रवासी वाहतूक थांबवून बेकायदा वाहनांवर कडक कारवाई करण्याची मागणी हजुरी पाठी संघटनेच्यावतीने नांदेड, बिदर, हिंगोली प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलीस अधिक्षक यांना केली आहे.

निवेदनावर हजूरी पाठी संघटनेचे अध्यक्ष दलजीतसिंघ बिशनसिंघ हजूरी पाठी, प्रदीपसिंघ जितसिंघ रागी व जगदीपसिंघ नंबरदार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजपा माजी महानगर अध्यक्ष यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ सप्टेबर-**

भारतीय जनता पार्टीचे माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले यांच्या वाढदिवसानिमित्त संध्या- छाया वृद्धाश्रमात क्षितिज जाधव व मित्रपरिवाराच्या वतीने अन्नदान वाटप करण्यात आले.

भारतीय जनता पार्टीचे पक्षनिष्ठ, निष्ठावान पदाधिकारी माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले यांचा वाढदिवस संध्या- छाया वृद्धाश्रमात भाजपाचे माजी चिटणीस क्षितिज जाधव व मित्रपरिवाराच्या वतीने साजरा करण्यात आला. मागील वर्षी सुमन बाल गृहातील अनाथ मुलींना कपडे वाटप करण्यात आले. तर यावेळी संध्या छाया वृद्धाश्रमात अन्नदान करण्यात आले. या कार्यक्रमास माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, सरचिटणीस विजय



गंभीरे, शितल खंडिल, व्यंकटेश जिंदम, तुळजाराम बागडीया, गुरुदिपसिंग संधू, अनिलसिंह हजारी आदींची उपस्थिती होती.

या कार्यक्रमासाठी उत्तम तिडके, विलास देवळे, प्रशांत धाकपडे, प्रफुल कांबळे, गौतम सारपाते, अजय सूर्यवंशी,मनोज चिंचोलीकर, धम्मा पंडित, पंकज खाडे, सुनील धुतमल,राजेश गायकवाड, विजय जाधव, विशाल दुधमल, संतोष गवळी, पवन जाधव, सुनील दुधमल, मारुती डाकोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश दहिफळे यांनी केले.

# अनुलोम संस्थेमार्फत पूरग्रस्तांना गॅस शेगडी, सिलेंडर वाटप

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ४ सप्टेबर-**

नुकतेच ढगफुटी मूळे लेंडी, तिरु नदीला झालेल्या महापूराने संसारोपयोगी साहित्य वाहून गेल्याने उघड्यावर संसार पडलेल्या हसनाळ, भिंगोली, रावणगाव येथील पूरग्रस्त कूटूंबाना अनूलोम या मूख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेच्या वतीने ३०० पूरग्रस्त कुटुंबांना गॅस शेगडी, सिलेंडर सह मोफत कनेक्शन वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

संपूर्ण महाराष्ट्रासह मुखेड तालुक्यात गेल्या बारा दिवसापासून पावसाने हाहाकार माजविला आहे. अनेकांचे बळी घेत शेकडो जनावरे पाण्यात मृत झालेली आहेत. तसेच शेतातील खरीप व भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. लेंडी, तिरु ,कूंन्द्राळा नदीच्या महापूरातअन्नधान्य, कपडे,यांच्या सह संसारोपयोगी साहित्य वाहून गेले. अंगावरील कपडे च शिल्लक आहेत होते अनेकांनी पूरग्रस्तांना कपडे ,ब्लॉंकेट, धान्याचे किट वाटप केले पण मदतीत मिळालेले धान्य कशावर शिजवावे असा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. हे पाहून राज्याचे मूख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या अनूलोम या सेवाभावी संस्थेच्या वतीने पूरग्रस्तांना गॅस ची शेगडी, सिलेंडर सह कनेक्शन मोफत वाटप करण्याचा निर्णय घेतला . त्याअनुषंगाने बा-हाळी येथील मंगलाई इंडेन गॅस ऐजंन्सीशी संपर्क करुन पूरग्रस्त कुटुंबांना शेगडी ,सिलेंडर वाटप करून दिलासा दिला आहे. अनूलोम राज्यात विविध सामाजिक ,आरोग्य विषयक, पर्यावरण संरक्षण यावर कार्य करीत आहेत. जलयुक्त शिवार, गाळमूक्त बंधारे ,तलाव या सारखे उपक्रम यशस्वी झाले.

यावेळी अनूलोमचे विजय मोरगूलवार (विशेष संपर्क अधिकारी महाराष्ट्र),पांडुरंग बूध्देवार (उपविभाग जनसेवक नांदेड), निलेश डांगे मूखेड,ज्ञानेश्वर अंगावार देगलूर, राम मूलंगे द.नांदेड, क्रष्णा ईंगळे नांदेड उत्तर, विशाल म्हेत्रे भोकर,राजेश म्हेत्रे नायगाव,साईनाथ कोटगीरे,केशव रापतवार बा-हाळी,पत्रकार दत्तात्रय तिपणे,उत्तम वाडीकर, नरसिंग अस्वले, सन्मूख मठदेवरु यांच्यासह परीसरात अनूलोम वस्तीमित्र,स्थान मित्र उपस्थित होते.

# यशोदा हॉस्पिटल सिंकदराबाद येथे हृदयातील गाठीवर यशस्वी शस्त्रक्रिया

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ४ सप्टेबर-**

नांदेड येथील रुग्ण फर्जाना बेगम यांच्यावर अति गंभीर रुग्णावर हृदयातील गाठीची ( मॅक्झोमा ) यशस्वी शस्त्रक्रिया यशोदा हॉस्पिटल सिंकरदराबाद येथील प्रख्यात सिव्हीटीएस सर्जन डॉ.विशाल खंते आणि त्यांच्या टिमने यशस्वीरीत्या पार पाडत रुग्णास जिवनदान दिले आहे .

याविषयी सविस्तर वृत्त असे की, हृदयातील गाठ ( मॅक्झोमा ) ने ग्रस्त रुग्ण फर्जना बेगम यांना दम लागणे , छातीत दुखणे व चक्कर येणे अशी लक्षणे अनेक दिवसांपासून होती त्यासंदर्भात त्यांनी नांदेड शहरातील सरिया हॉस्पिटल येथील तज्ञ डॉ. सुमया उबेद खान यांच्याशी संपर्क साधला असता डॉ. सुमय्या यांनी छातीचा इसीजी व टुडी ईको केले असता हृदयामध्ये गाठ दिसून आली. त्यामुळे हृदय कधीही फेल होऊ शकतो आणि पक्षाघाताचा धोका असतो हे लक्षात घेत रुग्णाला ताबडतोब ऑपरेशन करण्याचा



सल्ला देण्यात आला.


डॉ.सुमय्या यांनी रुग्णास सिकंदराबाद येथील सिव्हीटीएस सर्जन डॉ.विशाल खंते यांच्याकडे संदर्भित केले असता डॉ.विशाल यांनी डव्हान्स मिनीमल इमेज कार्डिया सर्जरीने हार्ट ओपन न करता कॅमेरा द्वारे यशस्वीरित्या काढण्यात आली. व रुग्णास चार दिवसांमध्ये डिस्चार्ज देण्यात आला. सदर रुग्ण हा पूर्णपणे व्यवस्थित असून . यावेळी रुग्णाचे पती आणि कुटुंबीयांनी यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे केलेल्या मदतीबद्दल मानले जनसंपर्क अधिकारी किरण बंडे यांचे आभार मानले.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी ; मुदखेड कॉंग्रेस पक्षाची मागणी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ४ सप्टेबर-**

मुदखेड तालुक्यात अतिवृष्टीने शेतकरी आणि नागरिकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले असून तात्काळ सरसकट शासन अनुदान देण्याची मागणी काँग्रेस तालुका व शहर कमिटीने तहसील प्रशासनाकडे केली आहे.

मघा नक्षत्रात जवळपास एकूण पावसाच्या २५% पाऊस झाल्याने शेती सोबतच तालुक्यातील विविध गावातील घरांमध्ये पुराने थैमान घातले. मुदखेड तालुक्यातील वरदडा तलाव फुटल्याने राजवाडी, पिंपळकोठा मगरे, डोणगाव मध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. शेती उध्वस्त झाली आणि गावात पाणी शिरले. यासोबतच सीता नदीला महाप्रलय आल्याने आजूबाजूची हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली गेली. तालुक्यातील वीस हजार हेक्टर शेती अतिवृष्टीमुळे बाधित झाली असून पिके वाहून गेली आहेत.



काँग्रेस पक्षाच्या वतीने अतिवृष्टी आणि पूर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकारने लवकरात लवकर आर्थिक अनुदान जारी करावी अशा आशयाची निवेदन नायब तहसीलदार मारुती जगताप यांना दिले. यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, करीम खान साब,मुजीब पठाण, गिरीश कोत्तावार, सूर्यकांत चौदंते, श्रीनिवास महाद्वाड, शिवाजी वडजे, ऋषिकेश चौदंते, अविनाश चौदंते, अजगर हुसेन, बाळू क्षीरसागर, लतीफ टेलर, महेश पवार, शिवानंद देवके, अतिक अहमद, मोईन फुलवाले, शिवाजी बोकेफोड, यशवंत रणखांबे, आकाश सोनटक्के, जनार्दन मुदखेडकर, रमेश बोडके, संतोष मेटकर, मारोती गाढे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कोल्हापूरच्या धर्तीवर निर्णय घ्यावा**


नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना २०१९ सालच्या कोल्हापूर येथील शासन निर्णयानुसार भरीव तरतूद मिळावी अशी मागणी संदीपकुमार देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या शासन निर्णयानुसार पूरग्रस्तांची कर्जमाफी, प्रचलित अनुदानाच्या तिप्पट अनुदान, घरकुल योजना, पूर पिडीत घरांना २४ ते ३६ हजार रु. तात्काळ अनुदान इत्यादी महत्त्वपूर्ण आर्थिक तरतुदी या अंतर्गत आहेत. अशा प्रकारचा शासन निर्णय नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी लागू करावा, अशी एकमुखी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे.

# हदगाव शहरात पोलिसांच्या वतीने पथसंचालन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ४ सप्टेबर-**

आगामी होणाऱ्या गणेश विसर्जनाच्या मार्गावरून हदगाव शहरातून पोलीस स्टेशनच्या वतीने पथसंचलन संपन्न झाले असून विसर्जनाच्या दिवशी शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात श्रींच्या भक्तांनी व नागरिकांनी सहकार्य करून पार पडावे असे आव्हान सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांनी यावेळेस केले.

नांदेड पोलीस दल व हदगाव पोलीस दलाच्या वतीने आज रोजी हदगाव शहरातून श्रींच्या विसर्जनाच्या मार्गावरून पथसंचलन करण्यात आले असून ज्यामध्ये एस. आर. पी. एफ .प्लटून ची तुकडी आरसीएफ ची तुकडी यांच्यासह हदगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी सहभागी झाले होते. पुढे बोलताना दिघे म्हणाले की, श्रींच्या



विसर्जनाच्या वेळी हदगाव शहरात तगडा बंदोबस्त राहणार असून कोणीही कायदा व सुव्यवस्था बिघडवणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी असे आव्हान त्यांच्याकडून करण्यात आले. हदगाव तालुक्यात एकूण १७१ गणेश मंडळाची नोंद असून त्यापैकी ४२ गणेश मंडळांची नोंद हदगाव शहरातील आहे अशी माहिती संकेत दिघे यांनी यावेळेस दिली. यावेळेस बेंबडे, मस्के, जुडे ,पाईकराव , पांचाळ, नागेश गायकवाड यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.